# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ८

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०९.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१७ ची मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्विनल कपील म्हेत्रे

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१०) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८) मा.लोंढे नम्रता योगेश

२९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०) मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३३) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३४) मा.अनुराधा गणपत गोरखे

३५) मा.केशव हनुमंत घोळवे

३६) मा.मंगला अशोक कदम

३७) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.संजय बबन नेवाळे

४१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४२) मा.भालेकर प्रविण महादेव

४३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.पवळे सुमनताई मधुकर

४९) मा.चिखले सचिन तुकाराम

५०) मा.जावेद रमजान शेख

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा.बाबर शर्मिला राजू

५४) मा.अमित राजेंद्र गावडे

५५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५८) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.कोमल दिपक मेवानी

६८) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६९) मा.सुलक्षणा राजू धर

७०) मा.शाम गणपतराव लांडे

७१) मा.सुजाता सुनिल पालांडे

७२) मा.योगेश मंगलसेन बहल

७३) मा.कदम निकीता अर्जुन

७४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७६) मा.नढे विनोद जयवंत

७७) मा.पाडाळे निता विलास

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.कोकणे संतोष अंकुश

८०) मा.पवार मनिषा प्रमोद

८१) मा.बारणे अर्चना तानाजी

८२) मा.अभिषेक गोविंद बारणे

८३) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८४) मा.ॲड. भोसले सचिन सुरेश

८५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६) मा.निलेश हिरामण बारणे

८७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९१) मा.ममता विनायक गायकवाड

९२) मा.कामठे तुषार गजानन

९३) मा.चोंधे आरती सुरेश

९४) मा.कस्पटे संदिप अरुण

९५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९७) मा.सुनिता हेमंत तापकीर

९८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१००) मा.कुटे निर्मला संजय

१०१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०३) मा.मुंढे उषा अंकुश

१०४) मा.कदम शशिकांत गणपत

१०५) मा.लोखंडे चंदा राजू

१०६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०८) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११०) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१११) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११२) मा.नवनाथ दत्तू जगताप

११३) मा.संतोष बबन कांबळे

११४) मा.सोनवणे शारदा हिरेन

११५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२०) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.अच्युत हांगे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.लांडे–मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.कांबळे, मा.ओंभासे - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, उत्तरप्रदेशमध्ये उत्कल एक्सप्रेसचे १४ डबे रुळावरुन घसरुन झालेल्या रेल्वे अपघातात निधन पावलेले २३ प्रवासी, पंजाब व हरीयाना येथे डेरा

समर्थकांनी केलेल्या दंगलीत निधन पावलेले ३६ नागरीक, दक्षिण काश्मिरमधील पुलावा जिल्ह्यात शहिद झालेले ८ जवान, नारायणगावजवळ एस.टी. व टेम्पो यांच्या झालेल्या अपघातात मृत पावलेले ९ प्रवासी, मुंबई येथे ११७ वर्षे जुनी इमारत कोसळुन निधन पावलेले २१ रहिवासी,यमुना नदीत बोट उलटुन झालेल्या अपघातात निधन पावलेले २२ प्रवासी तसेच शिरीष पै- जेष्ठ पत्रकार, लेखक, गौरी लंकेश - ज्येष्ठ पत्रकार यांची गोळ्या झाडून हत्या, अर्जन सिंग - निवृत्त एअरमार्शल, ह.भ.प.काशिनाथ महादेव नखाते -नगरसेवक चंद्रकांत नखाते यांचे बंधु, इंद्रायणी को-ऑप बँकेचे संस्थापक, कै.सौ.इंदुबाई लक्ष्मण भालेकर, कै.सौ.श्रीदेवी मेनन-सामाजीक कार्यकत्या, कै.ज्ञानोदा जीवानी, चिंचवड, बारकु साधु साने, माऊली चिंचवडे पाटील, आदर्शमाता वाराबाई लक्ष्मण गुजर, गोपाळ बारणे- भा.ज.पा. अध्यक्ष काळुराम बारणे यांचे वडील, रसिकलाल शहा- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते योगेश शहा यांचे वडील,व्यंकट काटकर काका, लक्ष्मी कांबळे, निवृत्ती सुतार-प्रभाग क्रमांक १६ रावेत, मल्हारराव मारुती मोरे- माजी उपजिल्हाधिकारी, परशूराम भिकू घुले, सखाराम पांडुरंग गावडे, चंद्रभागा लांडगे-प्रभाग क्रमांक २३, मुरलीधर आल्हाट यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

अर्जन सिंग यांच्या बाबतीत सांगायचे झालेतर १५ एप्रिल १९१९ रोजी पाकीस्तान येथे त्यांचा जन्म झाला. १९३८ मध्ये म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी ते हवाई दलात दाखल झाले. नंतर एक वर्षानी म्हणजे १९३९ मध्ये ब्रिटनमधील क्रॅनवेल आणि तेव्हाचे रॉयल एअरफोर्समध्ये त्यांना कमिशन मिळाले. दुसरे महायुध्द सुरु झाल्यावर पायलट ऑफिसर अर्जनसिंग यांच्या शौर्याला वाव मिळाला. तेव्हांच्या ब्रम्हदेशातील बर्मा आराकन विभागात पहील्या स्क्वाड्रनचे नेतृत्व त्यांनी केले. या युध्दातील त्यांच्या असामान्य कामगिरीबद्दल सैन्याच्या आग्नेय आशियाच्या प्रमुखांकडुन डिस्ट्रंग्डविश फ्लाईंग क्रॉस डिएफसी हे प्रतिष्ठेचे शौर्यपदक मिळवणारे अर्जनसिंग हे पहिले भारतीय वैमानिक ठरले. स्वातंञ्यानंतर १९५० मध्ये भारत प्रजासत्ताक झाल्यावर हवाई दलाच्या कार्यवाही विभागाची जबाबदारी अर्जनसिंग यांनी ऑपरेशनल डिसेंबर १९५२ पर्यंत आणि नंतर पुन्हा डिसेंबर १९५५ ते एप्रिल १९५९ पर्यंत सांभाळली. स्वातंञ्यानंतर ब्रिटनमधील ब्रॅकवेलच्या रॉयल एअरफोर्स स्टाफ कॉलेज, जाईंट सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज आणि लंडनच्या इम्पिरियल डिफेन्स कॉलेज या संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी अर्जनसिंग यांना पाठविण्यात आले होते. हे अभ्यासक्रम त्यांनी यशस्वीरीत्या पुर्ण केले. नंतर हवाई दलात विविध जबाबदा-या त्यांनी सांभाळल्या. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अर्जनसिंग यांनी विविध प्रकारच्या साठ विमांतून उड्डाण केले होते. हवाई दलाचे तिसरे प्रमुख म्हणून अर्जनसिंग यांची ऑगस्ट १९६४ मध्ये नियुक्ती झाली, तेव्हा ते फक्त ४४ वर्षाचे होते. एक ऑगष्ट १९६४ ते १५ जुलै १९६९ या काळात त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. वयाच्या ५० व्या वर्षी ते या पदावरुन निवृत्त झाले. १९६५ मध्ये पाकिस्तानबरोबर झालेल्या युध्दात अर्जनसिंग यांचे कुशल डावपेच विजयासाठी उपयुक्त ठरले. अखनूरमध्ये पाकिस्तानी सैन्याची दाणादाण उडवण्यात हवाई दलाने मोलाची कामगिरी बजावली. त्यांच्या कार्याची दखल घेत सरकारने त्यांना त्याच वर्षी

“पद्मविभूषण” सन्मान दिला. त्यांना अनेक पदकाने सन्मानीत करण्यात आले त्यामध्ये पद्मविभूषण आहे, समरसेवा स्टार, सैन्य सेवा मेडल, डिस्टिंग्डविश फ्लाइंग क्रॉस, वॉर मेडल, जनरल सर्व्हिस मेडल, रक्षा मेडल, इंडियन इंडिपेंडन्स मेडल, बर्मा स्टार, इंडिया सर्व्हिस मेडल अशाप्रकारे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. वरील मान्यवरांना तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

आजची सभा सोमवार दिनांक १६/१०/२०१७ रोजी दुपारी १.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कालच अमृत मिशनमध्ये महानगरपालिकेला १४७ कोटी रु. मिळालेले आहेत त्याबद्दल मा.आयुक्त साहेब, व त्याच्या बरोबर असणारे सर्व अधिका-यांचे याठिकाणी मनापासून अभिनंदन करते, धन्यवाद.

**मा.महापौर-** आजची सभा सोमवार दि.१६/१०/२०१७ दु.१.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ८</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

(दि.२०/०९/२०१७ ची तहकूब सभा)

दिनांक – १६.१०.२०१७ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/०९/२०१७ (माहे सप्टेंबर २०१७) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.१६.१०.२०१७ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.दत्तात्रय बाबूराव साने

७) मा.अश्विनी संतोष जाधव

८) मा.सारीका शिवाजी सस्ते

९) मा.राहुल गुलाब जाधव

१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१७) मा.गायकवाड निर्मला मनोज

१८) मा.सागर बाळासाहेब गवळी

१९) मा.गोफणे अनुराधा देविदास

२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२६) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२७) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२८) मा.फुगे भिमाबाई पोपट

२९) मा.ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

३०) मा.सावळे सिमा रविंद्र

३१) मा.लोंढे नम्रता योगेश

३२) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३३) मा.लांडे विक्रांत विलास

३४) मा.गीता सुशिल मंचरकर

३५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३८) मा.अनुराधा गणपत गोरखे

३९) मा.केशव हनुमंत घोळवे

४०) मा.मंगला अशोक कदम

४१) मा.अश्विनी भिमा बोबडे

४२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४३) मा.संजय बबन नेवाळे

४४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४५) मा.भालेकर प्रविण महादेव

४६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४९) मा.घोलप कमल अनिल

५०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.प्रमोद कुटे

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७०) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७१) मा.जयश्री वसंत गावडे

७२) मा.कोमल दिपक मेवानी

७३) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७४) मा.सुलक्षणा राजू धर

७५) मा.शाम गणपतराव लांडे

७६) मा.सुजाता सुनिल पालांडे

७७) मा.योगेश मंगलसेन बहल

७८) मा.कदम निकीता अर्जुन

७९) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

८०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.पवार मनिषा प्रमोद

८६) मा.बारणे अर्चना तानाजी

८७) मा.अभिषेक गोविंद बारणे

८८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८९) मा.ॲड. भोसले सचिन सुरेश

९०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९१) मा.बारणे माया संतोष

९२) मा.निलेश हिरामण बारणे

९३) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९४) मा.दर्शले रेखा राजेश

९५) मा.कलाटे राहुल तानाजी

९६) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९७) मा.ममता विनायक गायकवाड

९८) मा.कामठे तुषार गजानन

९९) मा.चोंधे आरती सुरेश

१००) मा.कस्पटे संदिप अरुण

१०१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०३) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०५) मा.कुटे निर्मला संजय

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.कदम शशिकांत गणपत

११०) मा.लोखंडे चंदा राजू

१११) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११८) मा.नवनाथ दत्तू जगताप

११९) मा.संतोष बबन कांबळे

१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२३) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२४) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२५) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२६) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२७) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.अच्युत हांगे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर- उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.आष्टीकर, मा.कडूसकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.राऊत-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र-०७ दि. १९/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.विलास मडिगेरी -** .महापौर साहेब, मुंबई येथे एलिफिस्टन रेल्वे पादचारी पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये २२ जणांचे निधन, भारतीय हवाई दलाचे हेलिकॉप्टर अरुणाचलमध्ये कोसळून हवाई दलाच्या ७ कर्मचा-यांचे निधन, बांदीपुरा जम्मु काश्मिर येथे आतंकवाद्यांशी झालेल्या चकमकीत २ जवानांचा मृत्यू तसेच अरुण साधु - ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार व पत्रकार, ह.मो.मराठे-ज्येष्ठ कादंबरीकार व साहित्यिक, टॉम अल्टर -पद्मश्री पुरस्कार विजेते आणि प्रसिद्ध अभिनेते, ब्रिज किशोर यादव-श्रीनगर मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निधन पावलेले, लष्करातील सहाय्यक निरिक्षक, राजीव राजळे -पाथर्डी तालुक्याचे माजी आमदार, रामभाऊ विष्णू भालेकर, महादेव शेलार यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभुवन -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.बाबासाहेब त्रिभुवन -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – १६.१०.२०१७

विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र.५०३, दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

**1)** आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

**2)** प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**1)** डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

**2)** महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय

संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

**3)** डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

**4)** दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

**5)** दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला. तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**6)** डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत

होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अंबरनाथ कांबळे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक – १
दिनांक – १६.१०.२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -७९ विषय क्रमांक – २
दिनांक -१६/१०/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.विकास डोळस, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१९ दि.२२/०८/२०१७

प्रभाग क्रमांक ४ दिघी बोपखेल मधील मौजे दिघी येथील मंजुर विकास योजनेत विविध आरक्षणे आहेत. सदर आरक्षणे नागरिकांना सोईसुविधा देणेकरीता मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. १) आ.क्र.२/१३८ – सांस्कृतिक केंद्र व वाचनालय क्षेत्र १००० चौ.मी., २) आ.क्र.२/१४२ – टाऊन हॉल क्षेत्र ५००० चौ.मी., ३) आ.क्र.२/१४५ – अग्निशमन केंद्र क्षेत्र ४००० चौ.मी., ४) आ.क्र.२/१५१ – खेळाचे मैदान क्षेत्र १०००० चौ.मी., ५) सिएई भिंती कडेचा दिघी शिव ते विठ्ठल मंदिर दिघी गावठाण पर्यंतचा १२.० मी. व १५.० मी. रुंद रस्ता व , ६) स.नं.३ व ५ मधील १५.० मी. रुंद रस्ता. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची

मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -८० विषय क्रमांक – ३
दिनांक -१६/१०/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/२५७/२०१७ दि.८/९/२०१७

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/८/२०१७अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ११२४३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ९९१४ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ६५४० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ५८९६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ७२२१ | मनपा बांधकाम- ४९०५<br>सी.एस.आर (एनजीओ) मार्फत बांधकाम - २३१६ |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | महिला – ९४ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष – ८१ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ५७४८ लाभार्थी | GOI+GOM=३४४.८८ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ११४.९६ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४५९.८४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ४५०५ लाभार्थी | GOI+GOM=२७०.३० लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB =९०.१० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३६०.४० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राहूल जाधव** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्वच्छ भारत अभियानाविषयी विषय या सभागृहामध्ये आलेला आहे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागाच्या व नगरसदस्य आणि नगरसदस्या यांच्या माध्यमातून खूप प्रमाणात आपण स्वच्छता अभियान आपल्या शहरांमध्ये राबवत आहोत परंतु आताची परिस्थिती अशी आहे की आपल्या शहरांमध्ये कच-याचे प्रमाण हे खूप वाढलेले आहे आणि विरोधी पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी असतील हे देखील आंदोलन करत आहेत परंतु आपणही जबाबदारीने तो विषय घेणं महत्त्वाच आहे. कारण त्यात घंटागाडयांची जर परिस्थिती आपण पाहिलीतर तर अत्यंत बिकट अशी परिस्थिती आहे प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ज्या गाड्या आपण देण्याचं गरजेचं आहे या गाड्या भेटत नाहीत कारण त्या गाड्या कार्यशाळेमध्ये दुरुस्तीसाठी गेलेल्या असतात यामुळे प्रभागांमध्ये ज्या गाड्या आवश्यक आहेत त्या गाड्या भेटत नाहीत. महापौर साहेब, तुम्हाला एक विनंती करतो. काही करून आपण त्या ठिकाणी या कच-याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावता येईल, प्रभागातला त्याचबरोबर सोसायट्या मधला, कॉलनी मधला आणि आपल्या ग्रामीण भागातील वाडीवस्ती वरचा कचरा योग्य पद्धतीने उचलला गेला पाहिजे अशा पद्धतीची काही तरी तजवीज आपण केली पाहिजे. महापौर साहेब, मी तुम्हाला विनंती करतो की आपण त्या ठिकाणी आरोग्य विभागाशी आणि आयुक्तांशी चर्चा करून प्रत्येक प्रभागामध्ये ज्या काही गाड्या आपल्याला ठरवून देता येईल त्या गाड्या ठरवून द्याव्यात म्हणजे आपल्याला कचरा उचलता येईल आणि कचरा न उचलल्यामुळे गटार ड्रेनेज सर्व चोकप होत आहे आणि त्या ठिकाणी देखील दोन क्षेत्रीय कार्यालय वाढल्यामुळे जे अधिकारी /कर्मचा-यांची आपण नेमणूक केलेली आहे ते अधिकारी देखील त्याठिकाणी नवीन असल्यामुळे ऐरीयाची माहिती नसल्यामुळे ब-याच ठिकाणची केलेली कम्पलेंट हि पेंडींग राहते. याकडे आपलं लक्ष वेधू इच्छितो. आयुक्त साहेबाना हि एक आठवण करू इच्छितो आरोग्य विभागाच्या संपूर्ण अधिका-यांना घेऊन आपण आजपर्यंत तीन वेळा याच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये मीटिंग लावलेली आहे. तरी देखील आपल्याला काही आउटपुट मिळतोय काय. त्यापासून काही फरक या आरोग्य विभागाची मिटींग घेतल्यानंतर शहराचा कचरा कमी

होण्यास मदत झाली आहे का हे देखील मी आयुक्त साहेबांना आठवण करून देतो. कारण की आजची परिस्थिती अवघड आहे. त्यामुळे महापौर साहेब, मी तुम्हाला नम्रपूर्वक कळकळीची विनंती करतो. आपल्याला काही करून हा प्रयत्न कच-याचा प्रश्न मार्गी लावणं गरजेचं आहे. त्यामुळे जी काही चर्चा वेडीवाकडी या शहरामध्ये होत आहे त्या चर्चेला लगाम लागेल. म्हणून लवकरात लवकर आपण हा निर्णय घ्यावा ही आपल्याला मनापासून विनंती करतो, धन्यवाद.

**मा.मिनल यादव** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अ प्रभागा मधे आणि बाकीच्या प्रभागांच मला माहिती नाही. अ प्रभागा मध्ये आता दिवाळी तोंडावर आली आहे आणि सगळे सफाई कर्मचारी, कच-याच्या गाडीवरचे कामगार संपावर गेलेले आहेत. अशा परिस्थितीत आम्ही काय करायच ? पाण्याचा तर आधीच प्रश्न आहे, आता त्यात सण तोंडावर आलेला आहे लोकांच्या दारात सात सात दिवसांचा कचरा पडलेला आहे आणि स्वच्छ भारत अभियाना पेक्षा ज्या बेस ग्राउंड लेव्हलच्या सोई आहेत त्या लोकांना आधी नीट पुरवल्या गेल्या पाहिजेत. कच-याच्या गाड्यांच्या इतक्या समस्या आहेत, दर चार दिवसांनी आम्ही फोन केला की कच-याच्या गाडीवरचे लोक म्हणतात की डीझेल नाही. आता ही काही कारणं झाली का? ही कारण आम्ही लोकांना सांगितलं तर हे म्हणतील हे प्रश्न तुम्ही आम्हाला सांगताय का? यासाठी निवडून दिल का, तुम्हांला ? आता सण तोंडावर आला चार दिवस लोकांच्या दारात कचरा आहे. आम्ही फोन करतो शिंदे साहेब म्हणाले, कच-याच्या गाडीवरचे सगळे कामगार संपावर गेलेले आहेत. अशा वेळेस तुम्ही काहीतरी सोय करून तात्पुरत्या कुठूनही गाडया अरेंज करा, सण तोंडावर आला असताना हे प्रश्न आहेत, काय सांगायचं लोकांना ? त्याच्यामुळे स्वच्छ भारत अभियाना पेक्षा आधी या ग्राऊंड लेव्हलच्या आरोग्यविषयक समस्या यांच्यावर तोडगा काढावा.

**मा.अभिषेक बारणे** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्वच्छता अभियानाच्या अंतर्गत आज परिस्थिती अशी झालेली आहे की आमच्या प्रभागामध्ये जे आपले कर्मचारी, जे कामगार आहेत हेच वापरले जातात स्वच्छता अभियानामध्ये त्याच्यामुळे होतं काय, दैनंदिन रोज ज्या भागामध्ये ते कचरा साफसफाई करायला जाणारे रोड साफसफाई करायला जाणारे कर्मचारी ते त्या ठिकाणी जात नाहीत. सगळे मिळून एकाच ठिकाणी जातात

आणि उरलेल्या सर्व ठिकाणी कचरा जैसे थे. अशी परिस्थिती आता आहे तरी प्रत्येकाला काम ज्या ठिकाणी वाटून दिलेल आहे त्याठिकाणी त्याच कर्मचा-यांनी काम करणं आवश्यक आहे आणि स्वच्छता अभियाना अंतर्गत नवीन कुठली टीम अजून काम करायला येईल त्याच्यासाठी आयुक्त साहेब प्रयत्न केला पाहिजे. आयुक्त साहेब, तुम्हांला मी दोन दिवसापूर्वी एक व्हिडिओ पाठवला होता गोरे साहेबांना मी एक महिन्यापासून तो व्हिडिओ पाठवतोय आमच्या परिसरामध्ये कचरा आहे त्या कच-यामध्ये झालेली डूकरं, या डुकरांचा एवढा त्रास होतोय की एकाने सुचवलं की तुम्ही एखाद पकडून घेऊन तुम्ही पालिकेत नेऊन सोडा. म्हणजे लोकांना इतकी घाण वाटते त्याची. गोरे साहेबांना मी रोज सकाळी त्यांना व्हिडिओ पाठवले नंतर त्यांचा मला रिप्लाय येतो. त्यांचा मॅसेज येतो, येस सर, शुअर सर, 100% पकडली जाईल. अशा लोकांवरती ज्यांनी डुकर सोडलेले आहेत त्यांच्यावरती काही गुन्हे दाखल करता येतात का ते पाहाव. संबंधित अधिका-यांवरती सुध्दा आम्हांला काही गुन्हा दाखल करता येऊ शकतो का याचा आम्ही प्रयत्न करणार आहेत. अशी परिस्थिती खराब आहे की अधिकारी लोक ऐकतच नाहीत. मी भारतीय जनता पक्षाचा आहे म्हणून ते मला गुडमॉर्निंग, येस सर, शुअर सर आणि कमळाच चिन्ह पाठवतात. म्हणजे अशी परिस्थिती असेलतर चुकीच आहेनां. अधिका-यांनी काम केलं पाहिजे. आज आम्ही पक्षाचे सर्व सदस्य वारंवार मीटिंग घेतो तुमच्याकडे. प्रामाणिकपणे काम करायचा आम्ही प्रयत्न करतो आणि प्रामाणिकपणे काम करत असताना आधिकारी लोक जर आम्हांला साथ देत नसतील तर मजा नाही. घंटागाडया पहील्यापण तेवढयाच होत्या, लोकसंख्या पण तेवढीच होती पण आताची परिस्थिती एकदमच म्हणजे भयंकर झालेली आहे. मी प्रभाग अध्यक्ष म्हणून अधिका-यांना फोन करतो त्यावेळेस अधिकारी मी मिटींग मध्ये आहे, इकडे गेलो तीकडे गेलो अशी उत्तर नसावीत आणि परिस्थिती बदललेली दिसली पाहिजे. अशी अपेक्षा करुन थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी भारतीय जनता पार्टीच्या राहूल जाधव, यादव ताई आणि अभिषेक यांचं मी मनापासून अभिनंदन करतो. स्वच्छ भारत अभियान आच्छे दिन, दिवाळीच्या तोंडावर आलेले अच्छे दिन. आम्ही कच-याचवरच बोलणार आहेत, अभिनंदन केलं तुमचं. आम्ही बोलण्याच्या आधी तुम्ही कच-याच्या

बाबत सिरीएस आहात आणि जगभरामध्ये भारतामध्ये स्वच्छता अभियान आदरणीय पंतप्रधान मोदी साहेब यांच्या माध्यमातून जगभर चालू असताना या शहरांमध्ये हालत खराब होत चालली आहे. गेले पाच-पाच सहा-सहा सात-सात आठ-आठ, दहा-दहा दिवस शहरांमधला कचरा उचलला जात नाही मग हे स्वच्छता अभियान फक्त फोटोसेशन चाललेलं आहे की काय. आपल्याला रोज व्हिडिओमध्ये माझा फोटो येईल, मी फोटोमध्ये येईल् आणि मी माझ्या परीसरामधल स्वच्छ परिसर केला की काय अशी फक्त प्रसिद्धीच चाललेली आहे की काय आस आमच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना वाटतय. मी पत्रकारांचे मनापासून अभिनंदन करेन गेले आठ-दहा दिवस सर्व व्हिडीओमधून कच-याच्या माध्यमांमधून कचरावेचक संप करतात, कचरा ड्रयव्हर संप करतात त्यांना पेमेंट दिलं जात नाही कच-याच्या कॉन्ट्रॅक्टरची हॅरॅशमेन्ट केली जाते. आज मला वाटतं "गुडमॉर्निंग" प्रभात पेपरमध्ये खुप मोठा लेख आलेला आहे. आमच्या फ प्रभागांमध्ये सर्व ड्रायव्हर लोकांनी गेली आठ दिवस संप केलेला आहे. मला खेदाने आपल्याला नमूद करावं वाटतं की गेल्या सहा महिन्या पूर्वी भारतीय जनता पार्टीची या ठिकाणी सत्ता आली असता यापुर्वी तेच अधिकारी तेच कॉट्रॅक्टर तीच टीम तेच लोकं हे सर्व असताना याच्या मध्ये बदल काहीही झालेला नसताना मला वाटतं आयुक्त साहेब आपलं यांवर दुर्लक्ष झालं की काय. आपण आल्यापासूनच हा प्रसंग आला की काय. शहरामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. शहरामध्ये कच-याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आमच्या भागामध्ये डेंग्यूचे प्रत्येक घरामध्ये २-२ ५-५ पेशंट हे त्रस्त आहेत. परवाच दोन दिवसापूर्वी माझ्या इथल्याचं वय वर्ष १८ वर्षाची मुलगी डेंग्यूने मयत झालेली आहे. एवढे सगळे असताना प्रशासन झोपा काढत की काय हा प्रश्न आमच्या पुढे आहे. कालतर त्या सचिन चिखलेवर गुन्हा दाखल केला. काय चूक झाली त्याची. प्रभागांमध्ये कचरा उचलला गेला नसेल तर आम्ही निदर्शनं कुणाकडे करायची, आमच्या घरापुढे करायची? आम्ही नीदर्शन प्रशासनाच्या दारातच करणार ना? घरगुती कचरा उचलला गेला असेल तर आम्हाला आंदोलन करायची गरज काय? यापूर्वीसुद्धा मी स्वतः आंदोलन केलेले आहे. मी स्वत: कचरा आणून टाकलेला आहे. सहा सहा महिने झाले, ठीक आहे एक महिना समजून घेऊ, दोन महिने समजून घेऊ, यंत्रणा तुम्हाला सुधारायला वेळ लागेल पण सहा-सहा महिने तोच विषय आपण बोलायचा असेल तर याच्या

पेक्षा प्रशासन सुस्त आहे की काय, झोपलं आहे की काय असं आम्हाला नक्कीच वाटायला लागलय साहेब. आम्ही आपल्याला विनंती करतोय. विनंती यासाठी करतोय इथून पुढे प्रत्येकाच्या जे काही तुम्ही सांगीतल आपल्याबरोबर चर्चा केली असता या महिन्यात टेंडर होईल त्या महिन्यात आमच टेंडर होईल, या लोकांना टेंडर दिल. साहेब टेंडर कोणाला द्यायचं याच्याशी आम्हाला बिलकुल मतलब नाही आमच्या सर्वसामान्याला टेंडरशी काहीही घेणंदेणं नाही. एखाद्याने आज दिवाळी तोंडावर आली असता प्रत्येकाच्या घरात जर हा प्रश्न आहे. कचरा टाकायचा कुठे, जर हा प्रश्न असेलतर गांभीर्याचा प्रश्न शहरात निर्माण झालेला आहे. साहेब, माझी आपल्याला विनंती आहे या येणा-या काळामध्ये तुम्ही आम्हाला सांगा किती दिवसात हे सगळ होईल. जर का आमक्या ठिकाणी छोट्या गाड्या जातात, टाटा एस त्या अधिका-यांना विचारलं असता ते सांगतात जुन्या गाड्या आहेत. मग नवीन गाडया काही घ्यायच्या का. तुमच काम नाही ते, गाड्या किती दिवसापासून किती दिवसापर्यंत चालतात हे काय कुठल्या नगरसेवकांचा काम नाही ते प्रशासनाच काम नाही का. या गाड्या पाच वर्षे चालणार का, दोन वर्षे चालणार आहेत का चार वर्षं चालणार आहेत हे काम कोणाच आहे, ते प्रशासनाचे काम असताना हे का योग्य वेळेत होत नाही? हा प्रश्न आत्ताच का आला? याच्यापूर्वी आला नव्हता का, त्यावेळेस त्या लोकांनी हाताळला नाही का, त्यावेळेस प्रशासनान तो प्रश्न हाताळला नाही का मग हा आता तुम्हाला का हाताळता येत नाही? तुम्ही प्रेशर खाली काम करता का? असं वाटतय साहेब, की तुम्हाला स्वच्छतेच्या बाबतीत अजिबात गांभीर्य नाही असा आयुक्त साहेब आमचा तुमच्यावर आरोप आहे. एक दिवस झालं दोन दिवस झालं सहा सहा महिने वाट बघतो साहेब पंधरा-पंधरा दिवस कच-याच्या गाड्या येत नसतील आणि तो कचरा रस्त्यावर येत असेल आणि त्याच्यामुळे दुर्गंधी होत असेल तर यालाही जबाबदार साहेब आपण आहात. म्हणून आपल्याला विनंती आहे साहेब, या येत्या काही काळामध्ये आम्ही आता बघणार नाहीत आयुक्तांची केबिन कुठली आहे, आयुक्तांचं घर कुठलं आहे आम्ही त्या त्या ठिकाणी किती गुन्हे कोणाला करायचे ते करा. आम्ही सरळ सरळ तुमच्या राहत्या घरात सुध्दा कचरा टाकायला भिणार नाहीत हे आयुक्त साहेब तुम्हांला सांगतो. कारण हा प्रश्न जनतेचा आहे हा कोणा एका दत्ता सानेचा किंवा येथे बसलेल्या नगरसेवकांचा नाही. आमचे हे नागरीक आमच्या कुठल्याही

नगरसेवकांना झोप येऊ देत नाहीत. सकाळी ६ वाजता पाण्याचे आणि संध्याकाळपर्यंत कचरा हे दोनच गोष्टी आम्हांला कराव्या लागतात बाकीचे काम नाहीत सध्या. म्हणून साहेब तुम्हाला विनंती करतो येत्या चार दिवसांमध्ये दिवाळीच्या आत तुम्ही कच-याची विल्हेवाट लावा अन्यत: याचे परिणाम सुद्धा तेवढेच तुम्हाला भोगावे लागतील.

**मा.मंगलाताई कदम** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजचा दिवाळीचा पहिला दिवस आणि राहूलने दिवाळीचा फराळ सुरू केला मी तर म्हणत होते विषय मंजूर करून टाका कारण दिवाळीच्या माध्यमातून अशी चर्चा करणे आणि मी तर म्हटलं होतं ही मिटींग संपल्यास २० मिनिटं करायच काय. कारण दोन वाजेपर्यंत बसायचं म्हटल्यावर सभागृहामध्ये अवघड परिस्थिती होते परत वर जाऊन खाली यायचं म्हटल्यावर परंतु चांगल्या विषयाला राहुलने हात घातला. घरचा आहेर किंवा घरचा फराळ जसा म्हणतात तशी राहुलने उत्तमप्रकारे सुरुवात केली. राहुल तुझे आभार. कमिशनर साहेब महापौर साहेब, शहरातील परिस्थिती खरंच खूप अवघड आहे म्हणजे कोणतेही नगरसेवक एखादा शब्द इकड तिकडचा बोलतील काही नवीन आहेत परंतु हे काही जरी बोलले तरीसुद्धा सद्य परिस्थितीत कमिशनर साहेब अक्षरशः फार वाईट परिस्थिती आहे बोलायचं किंवा नाही हा प्रश्न आहे? तुम्ही मला सांगा साहेब २९ तारखेला आपण सगळ्यांनी मिटिंग घेतली त्याच्यानंतर आपल ठरलं की शहरांमध्ये कच-याची परिस्थिती फार वाईट आहे परंतु ती वाईट परिस्थिती दुरुस्त करताना तुम्ही म्हणाला होतात मला थोडासा अवधी पाहिजे परंतु साहेब पुर्वीची जी यंत्रणा आहे ती पुर्वीची यंत्रणा आहेच ना. आम्हाला माहिती आहे मागच्या आयुक्तांना इथे काम न करण्यासाठीच पाठवलं होतं परंतु तुमची परिस्थिती तशी नाही आताची. तुम्हाला काम करण्यासाठी पाठवलेला आहे मागच्या वेळेला आयुक्तांना असं पाठवलं होतं की शहरांमध्ये तुम्ही काही काम करायचं नाही. फक्त बसायचं खुर्चीवर, आणि कुणी काही सांगितल तर सत्ताधा-यांनी सांगितलं तरी ऐकायचं नाही परंतु आतातर तुम्हांला सत्ताधा-यांनी सांगितलंतरी सुद्धा ऐकावच लागेल. कारण आजची परिस्थिती शहरांमधली इतकी वाईट आहे तुम्ही कुठल्याही ठिकाणी कुठल्याही चौकात जा कोणत्याही एरियात जा झोपडपट्टीत जा चांगल्या सोसायटीच्या एरीयात जा सगळीकडे काय आहे कचरा, कचरा आणि कचरा हा दिवाळीच्या फटाक्यांचा कचरा नाही. तर हा सगळा

रोजचा कचरा आहे ना याची विल्हेवाट लागतं नाही आणि खरच सत्य परिस्थिती आहे आता बारणे यांनी सांगितलं कि स्वच्छता अभियान आहे आम्हाला फोन येतो सकाळी येतो आठ वाजता वगैरे फोन येतो. आज अमुक अमुक ठिकाणी स्वच्छता अभियान आहे इकडचा पूर्ण स्टाफ उचलायचा आणि तीकड न्यायचा. म्हणजे इकडचा पाच-पाच, दहा-दहा किलोमीटरचा एरिया जो असतो तो तसाच ठेवायचा आणि जिथे स्वच्छता अभियान आहे तिथे जायचे आणि ऑलरेडी जिथे स्वच्छता अभियान असतं, महापौर, आम्ही स्वच्छता अभियानाला गेलेलो आहोत तिथला एरिया पहील्यांदाच आरोग्य विभागाने दोन दिवस स्वच्छ केलेला असतो कारण तिथे स्वच्छता अभियान आहे म्हणून आपण सुध्दा फोटोसाठी जातो. परंतु दहा किलोमीटरचे काय झालेलं असतं? दहा किलोमीटरचा जो परिसर आहे तो परिसर तसाच दोन दिवस विना झाडता तसाच पडलेला असतो त्यामुळे त्यात तो दुरुस्त करताना अधिका-यांना इतका त्रास होतो की परत म्हणतात ना येरे माझ्या मागल्या तशी परिस्थिती या अधिका-यांची झालेली आहे. त्यातन पेमेंट नाही. ज्या काही संघटना छोट्या-मोठ्या काम करतात त्याही नीट काम करुन देत नाहीत. त्यांनीही नीट काम करायचे नाही अशी परिस्थिती आमच्या अ प्रभागांमध्ये. म्हजेच शेवटी येणार लोड कुठला ? शहरावरच लोड येणारं ना सर ? आणि अशा माध्यमातून सणासुदीच्या वेळेला अधिका-यांना तुम्ही विश्वासात घ्या कर्मचा-यांना कॉर्पोरेशनच्या विश्वासात घेतलं पाहिजे. पूर्वीच कॉर्पोरेशन आहे, ठीक आहेना आता लोकसंख्या थोडीशी वाढली असेल परंतु जी पूर्वीची स्वच्छता असायची ती का होत नाही हे बघा. मग हे स्वच्छता अभियान करायचं असेल तर, जसं आपण म्हणतो की जशी क्लासरूम असेल त्या क्लासरुम मध्ये अभ्यास करावा. तस सर तुम्ही त्या लोकांना सांगा तु ज्या भागाचा अधिकारी आहेस ज्या वार्डात आहेस तिथे तू स्वच्छता अभियान रोज राबव. इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे करण्यात काहीच अर्थ नाही साहेब आणि कुठेही स्वच्छता अभियान होत नाही अधिका-यांना सुद्धा आम्हाला असं वाटतं नाही आम्ही सणासुदीच काही बोलणार नाही. तुमच्या घरात कचरा टाकून काय होणार आहे ? ऑलरेडी तुमच्या घरातही कचराच असेल. तुम्हाला काय टाकायचंय? आयुक्त साहेबांच्या येथील कमीत कमी थोडफार झाडतात. ते सर्कल जरी तुटलेलं असेल तर पूर्वी अशी परिस्थिती असायची जर सर्कल तुटलेल असेलतर घाबरून अधिकारी दुस-या

मिनीटाला ते सर्कल रिपेअर झालेल असायचं. आता कुठे रिपेअर होत तसं ? आहे तसंच पडलेलं असतं कमिशनर साहेबांच्या इथे सुद्धा म्हणजे परिस्थिती कशामुळे काय झाली आहे साहेब ? आमच्या अधिका-यांकडे काम करण्याची यंत्रणाच नाही आहे? त्यांच्याकडे टेंडर प्रोसिजरमध्ये ठेकेदार नाही. किंवा त्यांना एखादं दुसरं काम असं द्या की त्याना काम करता आलं पाहिजे. झोपडपट्टीमध्ये तुम्ही इंदिरानगरमध्ये जा अक्षरशः इतकी वाईट परिस्थिती आहे साहेब, परवाच्या दिवशी मी जावुन आले. सगळीकडे इतका कचरा जागोजागी आहे की विचारायची सोय नाही. म्हणजे मी नाव घेऊन बोलण्यात अर्थ नाही आम्ही पूर्वी असं म्हणायचं की आमच्या इथे कधीही कचरा पडला तर दाखवून द्या, अशी परिस्थिती होती. आत्ताची परिस्थिती भयंकर वाईट आहे साहेब तुम्ही लक्ष घालण्याचे गरजेचं आहे तुम्ही तुमच्या स्टाफला तुमच्या अधिका-यांना तुम्ही तुमच्या स्टाफची आणि अधिका-यांची मिटींग लावा. तुम्ही तुमच्या पद्धतीने त्यांना सांगा तुमचं घर अबाधित ठेवा. अगदी व्यवस्थित सगळं होईल मला असं वाटत नाही पूर्वीचच पिंपरी चिंचवड आहे वाढून वाढून वाढलय किती ? आणि का होत नाहीये इथे फक्त आत्ताची परिस्थिती मी तुम्हांला सांगते साहेब काय झालेल आहे ते. बॉर्डरवर जर वॉर्ड असेल तर माझ्या इथला वॉर्ड किंवा शेजारचा पलीकडचा वॉर्ड, किंवा अलीकडचा वॉर्ड असं कोठे असेल तर इथे ज्या चांगल्या गाड्या आहेत ना तर त्या लोकांनी सांगायचे तेथल्या चांगल्या गाड्या आमच्याकडे पाठवायच्या. आता कुठल्यातरी एका सदस्याने सांगितले या गाड्या तिथे त्यांच्या इथे कशासाठी, पुर्वीच्या जरी चांगल्या गाडया असल्या आणि त्या गाड्या तीथे जरी असल्या तरी ती गाडी तेथे ठेवायची नाही त्यांच्या नागरिकांना होऊ दे त्रास इकड गाडी पाठवा आणि हे जे त्यांचं चाललेला आहे ना अधिका-यांच त्यामुळे हा घोळ चाललेला आहे. आम्ही पण काय म्हणतो कळू देत ना नागरिकांना. यांना साध कच-याचे मॅनेजमेंट जमत नाही आमचे नागरिक अधिका-यांना बोलावून सांगतात आम्हाला २५ वर्षात कच-यासाठी कधीही फोन करावा लागला नाही आम्हांला कधीही पंचवीस वर्षांत पाण्यासाठी फोन करावा लागला नाही. ही परिस्थिती आहे मग एखादा पदाधिकारी जरी असेल किंवा कोणी असेल दुस-याच्या गाड्या काढून माझ्या वॉर्डात चांगल्या गाड्या आल्या पाहिजेत इथे कसंही झालं तरी चालेल. अशी परिस्थिती असते काय. लोक थोडेच थांबणार आहेत ? वेळ आलीतर काय कराव लागणार आहे साहेब, प्राइवेट ट्रॅक्टर घेऊन

कचरा उचलायला लागेल काही फरक पडत नाही आम्ही प्रायवेट ट्रॅक्टर लावून कचरा उचलू साहेब. आमचा आमच्या वार्डातून जिथ जिथ अशी वाईट परिस्थिती वाटेल तिथ आम्हांला प्राइवेट ट्रॅक्टर लावून कचरा उचलावा लागेल. परंतु तुम्हाला मी पुन्हा एकदा सांगते साहेब की तुम्ही तुमच्या अधिका-यांची मिटिंग घ्या आणि हे जे चाललेले आहे सगळं उलटंपालटं चाललेल आहे नां त्याच्यामुळे फक्त प्रॉब्लेम आहे साहेब, बाकी काही नाही पिंपरी चिंचवड तेवढाच आहे लोकसंख्या सुध्दा वाढली म्हणजे खूप काही वाढलेली नाही. लाखो करोडोंनी वाढलेली नाही लोकसंख्या. आहे तसंच पिंपरी चिंचवड आहे, आहे तशीच परिस्थिती आहे फक्त तुम्ही अधिका-यांना बोलावून घ्या त्या ठेकेदाराना अधिकारी बरोबर सांगतील आणि त्या पद्धतीने काम करून घ्या एवढाच विनंती आहे. धन्यवाद.

**मा.निलेश बारणे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पथमतः राहूल जाधव यांचे अभिनंदन करेल कारण की त्यांनी या विषयाला वाचा फोडण्याच खरंच धाडस केलं. आपण सत्तेत आहात त्यांच्या विरोधात जावुन तुम्ही केलं, राहूलदादा धन्यवाद. मा.महापौर साहेब, आपण सत्तेत आल्यापासून महापालिकेची स्थापना काही आज झालेली नाही. महापालिकेची स्थापना ही जुनी आहे. कच-याची समस्या दिवसेंदिवस सहा महिने झाले कच-याची समस्या वाढत चाललेली आहे. याच्यात काही गौडबंगाल तर नाही साहेब. यांच्यामध्ये कच-याची समस्या अचानक वाढली काय? लोकसंख्या काय अचानक वाढली काय आपल्या महानगरपालिकेची? महापौर साहेब, यांच्या मध्ये काहीतरी गौडबंगाल आहे. हे काम करत असताना महापौर साहेब, आयुक्त साहेब याच्यावर तुम्ही नजर ठेवून पाहील पाहिजे. मिटिंगमध्ये आपल्याला विचारल होत की आपल्याकडे गाडया, आज थेरगांव मध्ये पाहीलतर गाड्या ब-याच बंद आहेत व त्या बंद असल्यामुळे दोन-चारच गाड्या चालतात. यानंतर नवीन गाड्या घ्यायच्या आपला प्रस्ताव आहे मग नवीन गाड्या दरवर्षी आपण का घेतल्या नाहीत. याच आपण नियोजन केलं का, नियोजन नाही केल. जाणीवपूर्वक या समस्या वाढत चालल्या आहेत. महापौर साहेब,  एक आरोप करायचा आहे आज रेकिंग टेक्नॉलॉजी आहे थोडी माहिती मला भेटली. आज तुम्ही मोशी मध्ये जे कचरा विल्हेवाट लावायला रेकिंग टेक्नॉलॉजी वापरायची म्हणताय आज जी टेक्नॉलॉजी वापरायची म्हणताय ती टेक्नॉलॉजी वापरण्यासाठी

५० कोटींचे आपण टेंडर काढलेल आहे. महापौर साहेब, राजकोटला ती कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे. ब्लॅकलिस्टेड असताना त्या कंपनीला तुम्ही कसं काय टेंडर देताय? याचा खुलासा करावा. ज्यांनी निविदा काढली रिकींग टेक्नॉजीची त्यांनी तो खुलासा करावा. राजकोटला ही कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे आणि त्याला तुम्ही आज काम देताय. याचा खुलासा आयुक्त साहेब यांनी करावा अशी मी विनंती करतो.

**मा.राहुल कलाटे** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्वच्छ भारत, स्वच्छ भारत म्हणून संपुर्ण भारत देशात आज एक मॉडेलिंग सुरु आहे. रोज सकाळी कुठे ना कुठेतरी फोटो दिसतो. हे मॉडेलिंग करत असताना आपल्या शहराचा जर विचार केला तर मला वाटतं अभिषेक, राहूल जाधव, मीनलताई या सर्वानीच आपआपल्या वॉर्डातल्या व्यथा सांगितल्या की आज त्यांना कशाप्रकारे नागरिकांना सामोरं जावं लागतं. साहेब, आता मागच्यानी काय केलं, मागच्यानी काय केलं हे पुढेही उत्तर येत राहतील. पण या गोष्टीला सहा महिने झाले महापौर साहेब. सहा महिने झाले कुठेतरी अधिकारी, कुठेतरी कर्मचारी आणि  कुठेतरी प्रशासन यांच्यात अभाव हा प्रकर्षाने जाणवत आहे. साहेबांनी त्यादिवशीच सांगितलं की आठ-आठ, नऊ-नऊ वर्षे गाडया घेतल्या गेलेल्या नाहीत. पण ही अडचण या सहा महिन्यातच का आली. येथून माग कच-याची समस्या कुठल्याही प्रभागात कुठल्याही वार्डात जाणवत नव्हती. कुठेतरी शंकेला वाव निलेशने सांगितल्याप्रमाणे कुठेतरी शंकेला वाव निश्चितच आज सर्व सदस्य, नागरिकांच्या मनात आहे की कुठतरी अर्टीफिशीयल टंचाई होतेय का. तुम्हांला ते ठेकेदार काढायचेतर ठेकेही काढा. आमचे काहीही नाही पण या शहरातल्या नागरिकांच्या समस्या तुम्ही सोडवा. या शहरांतील नागरिकांच्या घराच्या समोरचा कचरा तुम्ही उचला. नाहीतर सफाई कर जो घेता तो मागच्या सहा महीन्याचा माफ करा. कुठेतरी या शहरातील नागरिकांना दिवाळीचे गिफ्ट तुम्ही चांगल्या प्रकारे द्या. आज अभिषेकने सांगितले, डुकर झालीत, कचरा झालाय, अधिका-यांचा एसएमएस गुड मॉर्निंगचा येतो आणि कुठलही काम सांगितलं की समोरुन येस सर येत पण त्याच्यावर ॲक्शन.  ॲक्शन काय नगरसेवकांनी घ्यायची का ?  तुम्ही नागरीकांना कळवून टाका की प्रत्येक प्रभागात डेपो करा आणि इथे आणून कचरा टाका म्हणाव. जर तुम्हाला उचलता येत नसेल तर परंतु तुम्ही या लोकांच्या आरोग्याशी खेळू नका. आज शहरात डेंग्यूचे

रुग्ण वाढलेत. ५५ च्या वरती स्वाइन फ्लूने पेशंट गेलेले आहेत. याला जबाबदार कोण ? आपणच. सिस्टीम देखील बदलली. आपण कच-याच्या निरीक्षकाला सांगीतल ते डिपार्टमेंट वैदयकीय कडे दिलय. आपण त्यादिवशीही सांगितलं की या महापालिकेत तो वेगळा वर्ग नाहीये. परंतु आमची तुम्हाला एकच विनंती आहे की तुम्ही त्यांचा समन्वय ठेवा. जो कचरा गोळा करायला येईल त्याच्या लक्षात येईल ना कुठ पाणी साठतय, कुठ दुर्गंधी येते त्याने जर तुम्हाला रेपोर्टीग केलं तर तुम्ही त्या ठिकाणी औषध फवारणी करा ना तुम्ही जर त्याच्याकडे दुर्लक्ष केलं तर निश्चितच आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत जातील. थंडी तोंडावर येऊन बसलेली आहे, परत तुम्ही म्हणाल थंडीमुळे स्वाइन फ्लू वाढला पण त्याच्या अगोदरच्या प्रिकॉशन्स तुम्ही शहरात घेताना दिसत नाही आहात. नाहीतर कुठे तरी मान्य करा की आमच्यात आणि सत्ताधा-यांमध्ये समन्वय नाही. जसा मोदींचा प्रशासनावर वचक आहे तसा या शहरातल्या नेत्यांचा तुमच्यावर वचक राहिलेला नाही. ते कुठे तरी तुम्ही सिद्ध करा. सचिन चिखले या ठिकाणी आलेले आहेत. सचिन आंदोलन करण्याच थांबवू नकोस कितीही गुन्हे दाखल होऊ देत. आम्ही लोकांसाठी भांडतो आमच्या काही स्वतःच्या घरातला कचरा उचललेला नाही म्हणून आम्ही आंदोलने केलेली नाहीत पण ते देखील तुम्ही दादागिरी करून दाबायचा प्रयत्न आज करत असाल... शहरात किती आंदोलनं आतापर्यंत झालीत आणि किती आंदोलनावर गुन्हे दाखल झाले. यांची माहिती संपुर्ण सभागृहाला द्यावी आणि आरोग्याशी न खेळता थोड राजकारण बाजूला ठेवून हे टेंडर लवकर आली पाहिजे, ते टेंडर लवकर आलीं पाहिजे यांच्यातन तुम्ही टेंडर्स करा त्याच्याशी आम्हांला काही नाही. पण या शहरातल्या नागरिकांच्या आरोग्याशी आपण खेळू नका. साहेब, तुम्ही सांगितलं होतं की दोन-तीन महिन्यात सगळं क्लीअर होईल. आज तुम्हाला येऊन देखील तीन महिने झाले. कदम ताईंनी सांगितलं की मागचे आयुक्त काम करण्यासाठी नव्हते आले, पण साहेब संपूर्ण शहर तुमच्याकडे अपेक्षेने पाहतय. एक महिना झाला दोन महिने झाले चार महिने झाले आपण शहरात आलाय त्यावेळी जी परिस्थिती होती तिच आजही आहे. उलट दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर होत चालली आहे याच्या बाबतीत मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण देखील लक्ष घालून त्वरित कच-याचा आरोग्याचा प्रश्न त्वरित सोडवावा. नाहीतर काय परत आहेच गुन्हे दाखल

करायला आम्ही सगळेच मोकळे. आम्हाला काही गुन्हे लोकांच्या, नागरीकांच्यासाठी भांडताना कुठल्याही प्रकारचा विचार करणारं नाहीत. सर्व आम्ही रस्त्यावर उतरुन नागरिकांच्या आरोग्यासाठी, कच-याच्या प्रश्नासाठी आम्ही निश्चितच आंदोलन करू. पण हे करत असताना आता हे रडगाणं कुठेतरी बंद करा. एवढे दिवस झाले, एवढे दिवस झाले. सहा-सात महिने झाले आम्ही पाहातोय. ९ महिने झाले. साहेब, आपण या प्रश्नाकडे गांभीर्याने पहावे, धन्यवाद.

**मा.योगेश बहल** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर आज दिवाळीचा पहिला दिवस आहे वसुबारस आहे आपल्या सर्वांना दिवाळीच्या मनापासुन शुभेच्छा देतो. वास्तविक पाहाता अजित पवारांनी दिलेला दाखला एकनाथ पवारांना पटला नाही परंतु आज सत्ताधा-यांनीच आपल्याला असमर्थततेचा दाखला दिलेला आहे की आपण नापास झालेला आहात. असमर्थ व नियोजन शून्य प्रशासन, हातबल सत्ताधारी याचं दर्शन आपल्याला आता होत आहे. आत्ता आमच्या मित्राने सांगितल्याप्रमाणे कोट्यावधीची टेंडर्स जरुर काढा परंतु प्राधान्य कशाला द्यायचं हे मात्र आपण आपल्या केबिनमध्ये बसत असताना सतत कुठल्यातरी ठेकेदाराला घेऊन आयुक्तांच्या केबिनमध्ये जात असताना हि अट शिथिल करा ती अट शिथिल करा हे रिटेंडर करा ते रिटेंडर करा एवढया कोटीच काम करा, तेवढया कोटीच काम करा. करा बाबानो, करा. त्या साठीच तुम्हाला लोकांनी निवडून दिलेलं आहे आणि स्वच्छ कारभार करण्यासाठी निवडून दिलेल आहे. परंतु हे करत असताना या शहराची स्वच्छता कुठल्या दावणीला बांधून ठेवलेली आहे हे पाहण्याच तुमच काम आहे या शहरांमध्ये स्वच्छते साठी आपण काय नियोजन केलं पाहिजे यासाठी पदाधिका-यांनी वेळ दिला पाहिजे. यासाठी गाडी खरेदी करा, त्यासाठी अधिकचे कॉन्ट्रॅक्टर नेमा. त्यासाठी अधिकचा पैसा वापरा काही हरकत नाही तुम्ही चांगली कामं निश्चित करा आणि तुम्हाला दहा वेळा सांगितलेल आहे आजही जाहीर सांगतो चांगल्या प्रकल्पाला, मोठ्या प्रकल्पाला पारदर्शक कारभारला आमचा पाठिंबा कायम असणार आहे परंतु हे करत असताना मोठ-मोठे टेंडर काढत असताना चांगलं काम करत असताना या शहराच आरोग्य, सर्वसामान्यांचे आरोग्य नागरिकांसाठी असलेली स्वच्छता, पाण्याचा तुटवडा, पाण्याचा तुटवडा काल परवा आयुक्तांशी चर्चा होत असताना त्यांनी सांगितलं की एवढ्या लोकांना दिलं गेल अनेक लोकांनी ताबा घेतला त्यामध्ये आहे त्या पाण्यामध्ये

नियोजन करतोत हे आम्ही समजू शकतो. तिथे आम्ही टीका केली का, नाही केली. त्यात तुमची कसरत होते मान्य आहे. परंतु त्यातून सुद्धा मार्ग काढण्यासाठी आता जे आपल्या दोन्ही मंजुरी शासनाने कॅन्सल केल्या, तुम्हाला पुन्हा प्रपोजल पाठवायला सांगितलेंल आहे. यासाठी तत्परतेने काम केलं पाहिजे. त्यासाठी भामा-आसखेड असेल, आंद्रा असेल त्यासाठी लवकर नियोजन करून तुमचं प्रपोजल लवकर पाठवा अधिकच पाणी कसं उचलायला परवानगी मिळेल ते बघा. अडचणी आहेत ना अडचणी कोण म्हणाल नाहीत. लोकसंख्या वाढते, अडचण आहे परंतु याच्यावर पर्याय आयुक्त साहेब काढणार कोण? हे सोडवणार कोण ? आम्ही इथे टीका करायला आलेलो नाही आम्ही इथे प्रश्न वाढवायला आलेलो नाही कोणीही असो सत्ताधारी असेल किंवा नगरसेवक असेल त्या प्रत्येकाला वाटतं की माझ्या वॉर्डामध्ये सकाळी उठल्यावर कच-याची कटकट नको. माझ्या वॉर्डामध्ये तुम्ही बघा सगळे ड्रेनेज जागोजागी प्रत्येक चौकामध्ये हा ड्रेनेज चोकप तो ड्रेनेज चोकप काय अवस्था आहे. ज्या ठेकेदारांना आपण चोकप काढायचे काम दिलेले आहे त्यांच्याकडे काही यंत्रसामग्री आहे का, वायरी नेतात, एक झाकण उघडल घुस लागली त्यामध्ये माती जमलेली आहे, माती काढायचं काम आमचं नाही. करायच असेल तर पैसे दया. मग त्यांच्यावर आपल्या कोणाच कंट्रोल आहे. ही मंडळी सर्रास पैसे मागतात. हे लोकांकडून पैसे मागतात. दोनशे रुपये द्या अडीचशे रुपये द्या पाचशे रुपये द्या हजार रुपये द्या तर आम्ही चोकप काढू. हे चोकप काढायचं जर टेंडर दिलेल आहे याच्यावर कंट्रोल कोणाचा आहे? कोण त्याची माहिती घेत? आता मंगलाताईंनी हे उदाहरण दिलं हे उदाहरण आमच्याकडे पण आहे पूर्वीचा पार्ट गंगानगर, एच.ए. कॉलनी, महेशनगर तो नेहरुगरला जॉईन होता, आता नेहरुनगगरचे लोक इकड येत नाहीत आणि इथला माणूस तिकडे जात नाही. आणा मध्ये असाच पट्टा, पाकिस्तानचा पट्टा असल्यासारख तिथं सफाई कामगार जात नाहीत. तुम्ही तुमच्या मनमर्जीने बदली करून टाकले. त्या एसआयला काही माहित नाही. त्या वायरमनला डीपी बॉक्स कुठे आहे ते माहीत नाही. साहेब, हे प्रभाग करत असताना आपण नागरिकांचे किती हाल करतोय किती गैरसोय करतोय आणि किती किती लोकांच्या कशा कशा बदल्या झाल्यामुळे आज सर्वसामान्य लोकांना छोट्या छोट्या गोष्टीं आहेत पण त्रास खुप मोठा आहे या छोटया गोष्टींचा. आठ-आठ दिवस लाईट लागत नाहीत

भोसरीच्या बाँड्रीमधला वायरमनला इकड टाकुन दिला त्याला आम्ही शोधायचं. त्याला बोललतर तो सरळ सांगतो साहेब मला याचा डीपी बॉक्स माहीत नाही. आमचा ज्युनिअर इंजिनीअर दुस-या प्रभागात गेला, डेप्युटी इंजिनीअर अमुक प्रभागात गेला साहेब हे काय करून ठेवलं आहे आपण? काहीतरी नियोजन आहे का? म्हणून मी नियोजनशुन्य म्हणलो. वास्तविक पाहता तुमच्यासारखा हुशार अधिकारी असताना सुद्धा तुम्हाला जे अधिकारी फीडबॅक देतातना साहेब, ते प्रॉपर देत नाहीत. हे आपण पदाधिका-यांचे किती ऐकावं याला सुद्धा काहीतरी मर्यादा ठेवा. की आपण खरोखरच लोकांचे हाल करतोय का. प्रभागाची एवढी तुम्हाला काय घाई होती. चार महीन्यानंतर केलं असत ना. हे झालं GST सारख. मग काढा तुम्ही शुध्दीपत्रक. करा पुन्हा अमेन्डमेन्ट. एक एक टेंडरमध्ये सुध्दा दहा-दहा वेळा अमेन्डमेन्ट करता. कशाला नेमलेत कन्सलटंट कशाला नेमलेत मग? त्यांना जर कोट्यावधी रुपये द्यायचे असेल, आज सुद्धा आपल्या पुढच्या अजेन्डयामध्ये तुम्ही नॅशनल, इन्टरनॅशनल लेव्हलचे तुम्हांला कन्सलटंट नेमायचे आहेत. तो आपण विषय ठेवलेला आहे. त्यांच नियोजन बघताय का तुमच्या मनाच सांगताय ? का मी आणलेल्या ठेकेदाराच ऐकताय. तुम्हाला काहीतरी करावा लागणार आहे. तुम्ही करा पण या शहरातला प्रश्न सुटला पाहिजे. या घाणीच्या कच-यापासून आपण मुक्त व्हायला पाहिजे पाण्याचा आपण नियोजन करा त्यासाठी तुम्हाला आम्ही टीका करणार नाहीत, तुम्हांला जी पाहीजे ती मदत आम्ही निश्चित करू. परंतु या परिस्थितीमध्ये सुधारणा आणण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे आणि ते आपण व्यवस्थित करा ही विनंती करतो, धन्यवाद.

**मा.आशाताई धायगुडे-शेंडगे** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने दिवाळीचा पहिला दिवस दिवाळीच्या मुहूर्तावर असं वाटल होत की चर्चा होणार नाही. मीटिंग लवकर संपेल परंतु हरकत नाही सगळेच जागरूक कार्यक्षम नगरसेवक असल्याने प्रत्येकाला वाटतं की माझं शहर माझा प्रभाग हा अत्यंत चांगला, देखणा, सुरेख, सुशील असला पाहिजे त्या दृष्टिकोणातून आजचा सणाचा मुहूर्त असून सुध्दा आज सगळे नगरसेवक या सभागृहात पोटतिडकीने आपापली मतं मांडत आहेत. साहेब, खरच सगळ्या नगरसेवकांचा मनापासून कौतुक केलं पाहिजे याला आमच्या राहुलदादानी सुरुवात केली त्यांचही कौतुक केलं पाहिजे.

परंतु साहेब आज ज्या पोटतिडकीने सगळे नगरसेवक सांगत आहेत. म्हणजे खूप याठिकाणी चर्चा झाली, आम्हाला आमच्या पैशानी पार ट्रॅक्टर लावण्या पर्यंतची वेळ जर येत असेलतर निश्चितपणे आपण सगळ्यांनी गांभीर्याने घेतलं पाहिजे. परंतु सन्मा.आयुक्त साहेब मला माहिती घेतल्यानंतर कळाले की आज आपण सगळेजण गाड्यांचा तुटवडा आहे अस म्हणतो, गाड्या खराब झाल्या असं म्हणतोय तर वास्तविक पाहता २००९-१० ला आपण ३०० टाटा एस म्हणजे छोटा हात्ती घेतले होते. हे २००९-१० ला घेतले. खर त्या कामाच नियोजन करायला हवं होतं तर प्रत्येक चार वर्षांनी आपण दहा-वीस-पंचवीस-पन्नास असे जे काही कमी होणारे गाड्यांचे, नादुरुस्त होणा-या गाड्या जशा असतील तशी आपण त्याची संख्या वाढवायला हवी होती परंतु मागच्या दहा वर्षांमध्ये किंवा आठ वर्षांमध्ये आपल्याकडून आपल्या महानगरपालिकेकडून प्रशासनाकडून असं कोणतही पॉझिटीव्ह पाऊल उचललं गेलं नाही आणि त्यामुळे सुदैव आमचं किंवा आपल्या देशाचे मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सुद्धा भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आणि अचानक पणे या १० वर्षातला तुटवडा आमच्यासमोर अगदी मोठा आ करून उभा राहिलेला आहे. वास्तविक पाहता आम्ही अजिबात करू शकत नाही किंवा आमच्या कडून होणार नाही असं अजिबात सांगायचं नाही या ठिकाणी. परंतु दहा वर्ष आपण या गाड्या ढकलत ढकलत आणल्या आता या गाड्यांना धक्का मारणसुद्धा शक्य राहीलेलं नाही अशा अवस्थेमध्ये आपण कुठेतरी आलो आहोत आणि मला वाटतं सभागृहामध्ये आत्ता येथे जे जे मंडळी बोलले, जे जे नगरसेवक बोलले या सर्वांना आयडीया आहे, कल्पना आहे की जर एखादी गोष्ट करायची असेल, टेंडर काढायच असेलतर, एखाद्या कामाला जर गती द्यायची असेल तर कोणीतरी केबिनमध्ये बोलवतो, ठेकेदारांना बोलवतो, कमिशनरकडे घेऊन जातो असे आरोप करत नाही, करत नाही म्हणायचं आणि सगळे आरोप करून घ्यायचे तोंडसुख घ्यायचं असं करण्यात मजा नाही. त्यांना चांगल माहिती आहे कोणतीही प्रोसेस करायची असेल तर त्याला किमान सात आठ नऊ दहा महिन्यांचा कालावधी लागतो. आज आपल्याला गाड्या खरेदी करायच्या असतील तर नुसत्या त्या गाड्या खरेदी करून चालणार नाहीत. आपल्याला कोणाच्याही हातामधे, कोलीत दयायचं नाही की आम्ही चुकीच्या पध्दतीने काम केलय असं आपल्याला दाखवायचं नाही

आयुक्त साहेब. त्यामुळे सन्मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब अत्यंत चांगल्याप्रकारे आपण या गाड्या घेण्याची प्रक्रिया असेल जी आपली गरज असेल शहराची, निश्चितपणे शहरांमध्ये कचरा नसलाच पाहिजे स्वच्छ शहर असणं ही तुमची माझी जबाबदारीच आहे आपल्या सगळ्या नागरिकांच्या आरोग्याची सुध्दा आपल्या शाहराची गरज आहे. आपण सगळ्यांनी याच्यावरील काम केलंच पाहिजे परंतु कोणाचीतरी बदली केली म्हणून काम स्वच्छ नाही असं म्हणण्यात अर्थ नाही. त्याच गाड्या, त्याच यंत्रणा, तेच ठेकेदार पण आहेत ना साहेब. ज्यांनी पंचवीस वर्षं कोणाच्यातरी हाताखाली पाणी भरलेल आहे. साहेब, ते अचानकपणे आमच्याकडे आल्यानंतर आपल्याला त्यांच्याकडून काम करून घ्यायचे. काम कोणता ठेकेदार करतो, कोणता अधिकारी करतो अजिबात आपल्याला या गोष्टींनी फरक पडला नाही पाहिजे. निश्चितपणे प्रशासन म्हणून, आयुक्त म्हणून सुध्दा तुमची तितकीच जबाबदारी आहे साहेब, की त्यांच्यावरती तुमचा हातशा असला पाहीजे, त्यांना तुम्ही सांगितल पाहिजे की आमचं शहर आम्हांला आहे तसं लखलखीत आणि स्वच्छ असल पाहिजे आणि आता म्हणजे आहे तसं म्हणते मी पण ख-या अर्थाने परंतु वास्तविक पाहता याच ठिकाणी दत्ता सानेनी सभागृहात आता कबुल केलं की मी याच्या पूर्वी सुद्धा आंदोलने केली आहेत कच-यावरती. त्यामुळे असं काही नव्हतं की कधी सुध्दा कचरा नव्हता असं अजिबात या शहरात घडलेल नाही. परंतु तेंव्हा घडल नाही, घडल का नाही याची मला शहानिशा इथे करायची नाही. काही अंशी आपल्याकडून काहीतरी चुका होत आहेत आज हे सगळे सदस्य या सभागृहामध्ये चर्चा करतात. निश्तिपणे काहीतरी कमतरता राहते आहे. त्याच्यावर वर्कआऊट करणं ही आपली, तुमची शहराच्या महापौरांची जबाबदारी आहे परंतु हे करत असताना येथून मागे कधी असं नव्हतंच, आसच होत, तसच होत आस म्हणण्यात मजा नाही, साहेब. निश्चितपणे शहरांमध्ये कचरा राहिलाच नाही पाहिजे कोणत्याही नगरसेवकाने कचरा, पाणी म्हणजे "न ग र से व क" म्हणजे नेहमी मला वाटतं की नळ, गटार आणि रस्ता म्हणजेच नगरसेवक अशी कुठेतरी आमची प्रतिमा होती आणि ही आजची नाही तर ही पुर्वी पूर्वीपासूनची आलेली आहे. त्यामुळे याच्यावरती कुठे तरी आपण ती प्रतिमा बदलायची कारण आज आपण चांगल्या प्रकारच काम या शहरांमध्ये करतोय. स्वच्छता अभियान या देशामध्ये राबवलं जातंय फोटोसेशन होतय का, नाही होत

यासाठी स्वतःच आत्मपरीक्षण करायचंय. आपल्या शहरांमध्ये आपण स्वच्छ काम करतोय का, आपण आपल्या आयुक्तांकडून चांगल्या प्रकारचं काम करून घेतोय का हा सुद्धा प्रश्न नगरसेवकानी आपल्या स्वत:ला विचारायचा आहे. निश्चितपणे आपण चांगल्या प्रकारचं काम या शहरांमध्ये करू शकतो. साहेब ड्रेनेजचा विषय जर झालाच तर ख-या अर्थाने सांगते साहेब, म्हणजे मला आजही आठवतय की २०१४ साली स्टँडींगच्या मिटींगला असताना ड्रेनेजचा विषय मंजूर झाला, तर त्याला काम द्यायचं ठरलं. आम्ही सांगीतल साहेब, त्याला जीपीआर सिस्टम लावाना. त्या ड्रेनेजच्या गाड्या किती फिरतात  किती नाही त्याच्यावरती दोन दिवस त्या विषयावरती सहया केल्या नव्हत्या. ही याच सभागृहाची वास्तविकता आहे. त्यामुळे ड्रेनेज हे वर्षानुवर्ष कधी ड्रेनेज क्लिन करायची पद्धतच नाही आणि आता आम्ही त्या काँट्रॅक्ट्रक्टरच्या लोकांच्या डोक्यावर उभे राहिलो तर ताई इसके पहीले कभी करताही नही था, काय को आप दिमाग खराब करते हो?  असं आम्हांलाच ऐकवल जातं आणि मग याठिकाणी या अधिका-यांना सुद्धा जेवढे चेंबवता येईल तेवढ, त्याची माणस इथे आहेत का तो तशा पध्दतीने चांगलं काम करतो का. ड्रेनेजची  खरच अवस्था तशी आहे, ही आजची नाही ही पुर्वी पासूनची आहे म्हणजे आम्हाला आमचा एखादा कार्यकर्ता त्या ड्रेनेजच्या चेंबरपशी उभा करत नाही तोपर्यंत चेंबर कधी येथून मागे पाच वर्षात साफ झाले नाहीत. आज बदल निश्चितपणे साहेब दिसला पाहिजे. पूर्वी होतं तसं येथून पुढच्या काळात आम्हांला चालणार नाही. हे साहेब तुम्ही सुध्दा लक्षात घ्या. महापौर साहेब ज्या पद्धतीने आपल्याला जी संकल्पना घेऊन सत्तेवर आलोत, ज्या अपेक्षेने नागरिकांनी आपल्याला निवडून दिलंय त्या सगळया नागरिकांच्या इच्छा आकांक्षा, अपेक्षा ज्या आपल्याकडून आहेत त्यासुद्धा पूर्ण करून देण्याची जबाबदारी महापौर साहेब आपली आहे. आणि त्याच पद्धतीचे आदेश तुम्ही आयुक्त साहेबांना दिले पाहिजेत. इथून पुढच्या काळामध्ये आपल्याकडून हा जो काही पाणी प्रश्न असेल,  ड्रेनेजचा प्रश्न असेल किंवा आता आपण ज्याच्यावरती ख-या अर्थाने कचरा करतोय त्या कच-याचा प्रश्न असेल याच्यावरती काम झालं पाहिजे. ज्या काही त्रुटी असतील ज्या काही कमतरता असतील त्याच्यावर त्वरीत कमिशनर साहेब आपण ऍक्शन घेतली गेली पाहिजे आणि आपण मागे खुप चर्चा करतोय गाड्यांचा प्रश्न आपण काही अंशी पुर्णात्वाला आलो सुध्दा तरी तिथेसुद्धा आपण रिझल्ट

ओरियंटेड काम या पुढच्या काळात दिल पाहीजे अशी अपेक्षा तुमच्या सगळ्यांकडूनच करते आणि थांबते, जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा.सुजाता पालांडे** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी प्रथमतः राहुल दादा तुमचं मनापासून स्वागत करते की सत्ताधारी पक्षामध्ये असून सुद्धा हिम्मत लागते कुठल्या पद्धतीने बोलावं आणि कुठल्या विषयाला वाचा फोडावी. दत्ताकाका तुमचहि मी स्वागत करते कारण दत्ताकाका तुम्ही जरी विरोधी पक्षांमध्ये असलात, जेंव्हा सत्ताधरी पक्षामध्ये असताना जे केलं तेच तुम्ही केलंत त्यामुळे तुम्ही स्वागतार्ह. कारण सत्तेमध्ये असतानासुद्धा दादा आमच्या काकांनी आंदोलने केलीत आणि आताही आंदोलनात्मक तोच पवित्रा घेतात. त्यामुळे सचिन तू घाबरू नकोस आम्ही सर्वजण तुझ्या मागे आहोत. आज बराचसा भाग हा आपला कच-यावर आरोग्यावर येतोय खरोखर आपली जी आरोग्याची परिस्थिती आहे ती थोडीशी गंभीर आहे पण पहिल्यांदा कधीही ही परिस्थिती गंभीर नव्हती असं काही नाही कारण गेल्या पंचवार्षिकला सुद्धा नगरसेवक असताना, कारण नगरसेवक म्हणजे वॉटर, मीटर आणि गटर या तीन गोष्टी नगरसेवकांनी व्यवस्थित द्यायला पाहिजेत. खरं पाहिलं तर आम्ही जेव्हा प्रत्येक नगरसेवक ज्यावेळी आम्ही आमचे काम करतो त्यावेळेला वॉटर, मीटर आणि गटर या तिन्ही गोष्टी चांगल्या असल्या तर आमचा प्रभाग चांगला असतो. प्रभाग चांगला तर बाकीचे प्रभाग चांगले आणि बाकीचे प्रभाग चांगलेतर पूर्ण शहर चांगलं. आता बरेचसे नगरसेवक गेल्या वेळेला आपल्या बोलण्यामध्ये असं म्हणतात की लोकसंख्या थोडीशी वाढली. मला तर वाटतं लोकसंख्या वाढली काय आणि न वाढली काय याने काही फरक पडत नाही. पण आपलं प्रशासन कुठल्या पद्धतीने काम करतं. त्याबरोबर नागरिकही तसे वागतात आणि त्याबरोबर नगरसेवकही या प्रभागात कसा काम करतो या तिन्ही गोष्टींची जर सांगड झाली तर मला वाटतं त्या प्रभागात आरोग्य चांगलं राहतं. आजही जेव्हा माझा पहिला ३९ प्रभाग क्रमांक होता तेव्हा फक्त १८ हजाराची लोकवस्ती होती आता माझ्या संपूर्ण प्रभागात ५३४०० लोकसंख्या असलेल माझा प्रभाग आहे. जेवढे लोक वाढणार तेवढे प्रॉब्लेम वाढणार. आज माझ्या प्रभागांमध्ये ५ झोपडपट्ट्या आहेत. त्या पाच झोपडपट्ट्यांमध्ये परिस्थिती वेगळी आणि संत तुकाराम मधिल जून्या ३९ मधील परिस्थिती वेगळी. आत्ताच मघाशी एका नगरसेवक

सहकार्याने सांगितलं की ड्रेनेजची आमच्याकडील व्यवस्था अतिशय घाणेरडी झाली आहे पण मला आज माझ्या प्रशासनातील अधिका-यांना विचारायचंय की गेल्या वेळेला ज्या वेळेला अनधिकृत बांधकामे वाढत होती त्यावेळेला आम्ही सगळेजण काय करत होतो. अनधिकृत बांधकाम करताना माझा वार्डात माझ्या ब-याचशा नागरीकांनी बांधकाम करताना ड्रेनेजच्या झाकाणांवर केली आहेत कारण त्याला आम्ही शह दिला होता. पण कुठेतरी नगरसेवक म्हणून मी सुद्धा उत्तरदायित्व स्वीकारलं पाहिजे. आम्ही सुद्धा चुका केल्यात. कारण ज्या वेळेला ज्या पद्धतीने झाकणांवर बांधकाम झाली आणि आता ड्रेनेजचे जेंव्हा आम्हांला काम करावे लागते तेव्हा हे सोडून त्या पध्दतीने आम्हाला एरिया मध्ये काम करावं लागतं. आज प्रशासनाला फक्त धारेवर धरून चालणार नाही. आणि सत्तारुढ पक्ष कुठलाही असो गेल्या वेळेला एका सत्तारुढ पक्षामध्ये मी नगरसेवक म्हणून काम करत होती आत्ताचेच प्रॉब्लेम त्या पंचवार्षिकला सुद्धा होते. मांडण्याची पद्धत वेगळी बोलण्याची पद्धत वेगळी. मला वाटतं आत्ताचा सत्ताधारी पक्ष शिकतो आणि टेंडरिंग बद्दल एकाने म्हटलं की अटी, शर्ती शिथिल करण्यामध्ये तुमचा वेळ जातोय आणि अशा अटी, शर्ती ज्या काही असतील या गेल्या सत्ताधारी पक्षानेच त्याच्यामध्ये टाकल्या होत्या, कारण त्याच्यामध्ये ओपन टेंडररमध्ये कोणीही खेळता कामा नये. आमची स्वतःची जी माणस आहेत तेवढीच बसली पाहीजेत. आयुक्त असतील पदाधिकारी असतील त्यांना आम्ही हॅटस् ऑफ करते कारण त्यांनी चांगल्या पद्धतीने काम करायला सुरुवात केली आहे. आज नुसते प्रशासनाला दोष देण्यापेक्षा आज पहिल्यांदा जेंव्हा कचरा कुंडीचा आकार ७ घनमीटरचा होता आता कोणी विचार केला आहे का या कचरा कुंडीचा आकार किती आहे? आज साडेचार घनमीटरचा आकार आहे. एका वेळेला जेव्हा ७ घनमीटरचा कचरा उचलला जात होता आता साडेचार घनमीटरचा कच-याची कुंडी भरायला वेळ लागत नाही आणि त्यामुळे घणींचे प्रॉब्लेम्स आहेत. ज्या पद्धतीने आशाताई म्हणाल्या की २००९-१० मध्ये झालेली टेंडर्स आहेत त्यानंतर टेंडर्स झाली का? गाड्या घेतल्या का? कॉन्ट्रॅक्ट बेसिस वर घेतलेली लोक किती आहेत ? आणि आपली कॉर्पोरेशनची काम करणारे लोक किती आहेत. कारण कॉर्पोरेशनची काम करणा-या लोकांना आम्हाला दमदाटी करता येते पण कॉन्ट्रॅक्ट वरची काम करणारी लोक जी आहेत, अगोदरपासूनची जी आहेत त्यांना आम्हाला दमदाटी करता येत नाही

किंवा बोलता येत नाही कारण ती कॉन्ट्रॅक्ट बेसिस वरची लोक असतात. आज बीव्हिजी असेल, बाकीच्या दुस-या संस्था असतील ज्या पद्धतीने काम करताय या पद्धतीने त्यांना आम्हाला बोलता येत नाही कारण प्रत्येक वेळेला त्यांनी आम्हांला असं सांगितलं किं आमचे टेंडर्स संपलय, आमच टेंडर येणार आहे. कुठल्याही सत्तारूढ पक्षाला असं वाटत नाही की जेंव्हा आम्ही पदावर येतो किंवा आम्ही सत्तेवर येतो तेव्हा काम चांगलं झालं नाही पाहिजे. मला वाटतं आयुक्त खरोखर तुम्हांला थोडस लक्ष गांभीर्याने द्यावं लागेल. की कुठल्या पद्धतीने तुम्हाला प्रशासनाची घडी बसवायची आहे. आरोग्याची घडी बसवायची या पद्धतीने बदल्या होतच राहणार अगोदरही झाल्या, आताही होणार आहेत. त्यामुळे बदली झाली म्हणून काही आरोग्याचा प्रश्न भेडसावला अशी गोष्ट नाही. पण आयुक्त साहेब तुम्हाला तुमच्या सर्व आरोग्य अधिका-यांना घेऊन बसावं लागेल आणि या पद्धतीने तुम्हाला काम करावं लागेल. आज मी सरकारला, माझ्या भारतीय जनता पार्टीच्या सरकारला प्रथमतः मी त्यांचे आभार मानणार आहे पण अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्याचा जो त्यांनी अध्यादेश काढला त्याबद्दल त्यांच मी मुद्दाम येथे अभिनंदन करते. कारण जी अनधिकृत बांधकाम आहेत, ड्रेनेजचे विषय आहेत, आरोग्याचे विषय आहेत ते का उद्भवले याचा त्यांना सुद्धा विचार करावा लागेल. आयुक्त साहेब आपण थोडस जास्त लक्ष याच्याकडे द्यावं. ड्रेनेजचे विषय करताना सुध्दा आपण ज्या वेळेला झोपडपट्ट्यांमधून काम करतो त्यावेळेला मला वाटत माणशी एका सीट मागे ४० माणसं असं असते पण आज माझ्या लांडेवाडीमध्ये एका सीटसच्या मागे १३२ लोकांना थांबाव लागत. लोकांना थांबावं लागल असतं. आज एका संडासच्या मागे ३०० लोक तर दुसरीकडे एका टॉयलेटच्या मागे १०० लोक, वैशाली नगर मध्ये एका सीटसच्या मागे ३०० लोक मला थांबवावी लागतात पण हे काय आत्ताचं नाही आहे. हे गणित कसं बदलेल आयुक्त साहेब तुम्हाला खूप काम करायचंय अगोदरच्या आयुक्तांनी पण सगळ्यांनी कामे केली आहेत. मला वाटतं तुम्ही श्रीकर परदेशी सारख काम करणारे आयुक्त आहेत. तुम्ही आत्तापर्यंत घेतलेले निर्णय खरोखर खुप चांगले आहेत असेच तुम्ही निर्णय घ्यावेत आणि आरोग्याचा जो विषय गंभीर आहे याकडे स्वतः लक्ष द्यावं एवढंच बोलते इथेच थांबते, जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सभागृह, सर्व पत्रकार बंधू नागरिकांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा. आज स्वच्छतेच्या संदर्भात जी चर्चा चालू आहे त्या चर्चेमध्ये ज्यांनी ज्यांनी सांगितलं की फोटो सेशन केले, फोटो टाकले, फोटो पाहिले, स्वतःचा प्रचार केला. मला असं वाटतं त्यांनी खरच एकदा आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. गरज यासाठी आहे मा.महापौर साहेब, या शहरातल्या १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत जो पंधरवाडा स्वच्छता अभियान म्हणून राबवला गेला त्यामध्ये अनेक सेवाभावी संस्था या रस्त्यावर उतरल्या. अनेक नागरिक स्वच्छताप्रती रस्त्यावर उतरले आणि हा त्यांचा अपमान आहे. अनेक वृत्तपत्रांनी यामध्ये आघाडी घेतली होती त्यांचा सुद्धा अपमान आहे आणि खरच आपण नगरसेवक म्हणून त्यांचा अपमान करण्याचा आपल्याला अधिकार आहे का? त्यांच्या चांगल्या हेतूला हरताळ फासण्याचा आपल्याला अधिकार आहे का? केवळ आपण बोललो आणि त्याच्यामुळे पेपरमध्ये दोन ओळी छापून येतील म्हणून आपण कोणावर तरी टीका करायची हे काही योग्य नाही, मा.महापौर साहेब. अजिबात योग्य नाही. स्वच्छता अभियान यासंदर्भात मी सांगेल ज्या ज्या अधिका-यांनी या ठिकाणी मेहनत घेतली होती त्या सगळ्यांचे अभिनंदन. त्यात सगळे एसआय असतील, सीएसआय असतील मा. कमिशनर असतील सर्व अधिका-यांचे याठिकाणी अभिनंदन करेन कारण त्यांनी खरोखर प्रामाणिक प्रयत्न केला होता मा.महापौर साहेब. आयुक्तांनी सुद्धा त्याठिकाणी नदीत उतरून त्या ठिकाणी गाळ साफ केलेला आहे. त्याठिकाणी नुकतंच नवरात्र होऊन गेलेलीं होतीं आणि अनेक प्रकारचं निर्माल्य त्या नदीपात्रामध्ये होतं आपण हातानी भरलेलं आहे. मा. महापौर साहेब, आपण सुद्धा त्या मोहिमेमध्ये सहभागी होतात. त्यामुळे नाटक केलं असं जे कोणी म्हणतात मला असं वाटतं की त्यांना याचा स्वतःमध्ये खर स्वतः वरती अभ्यास केला पाहिजे की आपण काय बोलतो आणि कोणाचा अपमान करतोय. या शहराचे अनेक करदाते नागरिक संस्था त्या ठिकाणी उतरल्या होत्या आणि म्हणून त्याठिकाणी अशा प्रकारच्या वक्तव्याचा मी निषेध करते, मा. महापौर साहेब. दुसरं असं की काकांनी आता इथे सांगितलं की त्यांनी सत्ताधारी असताना सुद्धा या ठिकाणी आंदोलने केली होती काका तुमच्या आंदोलनाला पाठिंबा. परंतु आंदोलन करत असताना आजपर्यंत कमिशनरांच्या घरावरती कुणीही आंदोलन केलेलं नाही. कुठल्याही राजकीय नेत्याच्या घरापर्यंततर आपण कुणीच गेलोलं नाहीत. अगदी विरोधात आम्ही असतानासुद्धा आणि तुम्ही असताना सुद्धा. त्यामुळे

कमिशनरच्या घराच्या संदर्भाबद्दल बोलले याचा मी या ठिकाणी कडक शब्दात निषेध करते. परवा सचिन चिखलेंनी आंदोलन केलं. आंदोलन कशासाठी केलं होतं सचिनने स्वच्छता होत नाही म्हणून. कचरा आणला तो टाकला आणि तो उचलून नेला असतातर सचिन तुझे अभिनंदन केलं असतं. परंतु जी स्वच्छता होत नाही म्हणून तुम्ही आंदोलन केले तो कचरा या ठिकाणी ३ तास महानगर पालिकेचे कर्मचारी उचलत होते, स्वच्छ करत होते, साफ करत होते. पाणी मारून त्या ठिकाणी त्यांनी तो कचरा साफ केलेला आहे. म्हणून सचिन पुढच्या वेळेस आंदोलन करताना निश्चितपणे एवढी आपण खबरदारी घ्या कि जो कचरा आपण आणून टाकणार तो आपण उचलून पण न्यायचा. त्यात गांधीगिरीही होते आणि चांगला संदेश सुध्दा जातो. आपण काय करतो तर, आपण चांगल आंदोलन करण्याच्या नादामध्ये आपणच त्या ठिकाणी कचरा करून गेलो त्यानेच आंदोलनाला गालबोट लागलं तुमच्या. त्यामुळे आंदोलन कुणी करावं, कसं करावं याबद्दल आम्ही भाष्य करणार नाहीत. परंतु करत असताना मोठी बहीण म्हणून एक सल्ला देते पुढच्या वेळेस आंदोलन केलं तर कचरा पण उचलून घेऊन जा सोबत. काका आजपर्यंत आपण कोणाच्या घरापर्यंत गेलेलो नाही. येथून पुढे ही कुणाच्या घरी जायचं नाही. महापालिका असतील, क्षेत्रीय कार्यालय असतील, कुठेही करा पण वैयक्तिक कुणाला टार्गेट करायचं नाही वैयक्तिक टार्गेट केलं तर निश्चितपणे आंदोलनाची धार कमी होते. मा. महापौर साहेब, याठिकाणी मघाशी आशाताईंनी, सुजाता ताईंनी खूप चांगलं वक्तव्य केलं की कर्मचा-यांची बदली झाली म्हणून कुठे कचरा अडलेला नाही कर्मचारी तेच आहेत, कॉन्ट्रॅक्टही तेच आहेत, नवीन कॉन्ट्रॅक्टर अजून नेमायचे आहेत. जे काही मागच आहे तेच धुणं धुता धुता चार पाच महीने गेले. नवीन काही करायला गेलोतर काहीना काहीतरी आडवी मांजर जातीच आहे. सारखं आपलं काम तेच चालू आहे मा. महापौर साहेब. मघाशी कोणीतरी सांगीतल की ५० कोटीच काहीतरी टेंडर काढलं. आता एकतर टेंडर काही नवीन कुठल झालेलं नाही. टेंडरची आत्ताशी कुठे प्रक्रिया चालू आहे मा.महापौर साहेब. त्यामुळे नवीन कुठे काय झालं असेल, त्यांच्या जर काही सुचना असतील तर त्यांनाही आपण पार्टिसिपेट करू देत तो निश्चितपणे कमिशनरांचा अधिकार आहे त्यामध्ये. मा. महापौर साहेब, वारंवार, वारंवार सगळ्यांचं मला माहीत नाही की म्हणजे ठीक आहे टेंडरिंग बद्दल बोलल पाहिजे पण अस जर काही असेल ना मा. महापौर साहेब, की टेंडर केल नाही पाहिजे तर तसा ठराव या सभागृहात करुन टाका. नवीन टेंडरिंग करता, नवीन टेंडरिंग

करता नवीन अटी , शर्ती टाकता, आता काही अटी-शर्ती जर पाहिल्या तर एक्स, वाय, झेड दोन-तीनच लोक त्यामध्ये पात्र होत होते. आणि त्यांच्यावरती या महापालिकेचा गाडा आम्हाला हाकलावा लागत होता. साफसफाईच्या संदर्भात तर मा.हायकोर्टाचे निर्देश आलेत म्हणून आपण त्या ठिकाणी नवीन टेंडर प्रोसेस करायला आपण मा.न्यायालयाच्या निर्देशांस आणून दिलेल आहे. सगळ्यांचा एकंदर रोख पाहिला तर स्वच्छता झाली पाहिजे यामध्ये कोणाचंही दुमत असण्याचं काही कारण नाही. कचरा उचलण्याचे जे काही नवीन आता आपण काम काढणार आहोत त्यामध्ये ज्या संस्थांना काही म्हणतात संस्था ठेवा काही म्हणतात नका ठेऊ कुणाला काढायचं हे तुमच्या आणि माझ्या हातामध्ये नाही. पण गोरगरिबांचा कोणी अधिकार जर त्या ठिकाणी मारत असेल तर निश्चितपणे त्यात सुद्धा पोटावरती पाय देण्याचा अधिकार आपल्याकडे आहे हे सुद्धा आपण आपल्या या कारवाईतुन दाखवून दिलेल आहे. ज्या काही आता आम्ही या सगळया टेंडरच्या संदर्भामध्ये सफाईच्या स्वच्छतेच्या संदर्भामध्ये आम्ही गेलो तर ६७ संस्थांपैकी एकही संस्था आम्हाला अशी मिळाली नाही कि ज्यांनी कर्मचा-यांचा ईएसआय/पीएफ भरलेला असेल. गठ्ठयानी आपण ज्यावेळेस कारवाई करण्याचे आदेश दिले स्टॅंडिंग कमिटीने त्यावेळी ज्या संस्था होत्या त्यांनी एका वर्षा वर्षाचे एकदम ईएसआय आणि पीएफ भरलेले आहेत मा.महापौर साहेब. हायकोर्टाने त्यामध्ये सुद्धा माहिती मागवली. ज्यांनी गठ्ठयांनी भरले असेल त्यांना ब्लॅकलिस्ट करा, ज्यांनी काहीच भरले नसेल त्यांना ब्लॅकलिस्ट करा. ज्यांनी एकच चलन दहा दहा वेळा दिलेल आहे त्यांच्यावर ही कारवाई करा. आता कुणाकुणावरती कारवाई करायची. या सगळ्यांवरती कारवाई करायला गेलोतर मला वाटतं महापालिकेला एकच काम उरणार आहे. येथून मागच्या वेळेस सुद्धा दखल घेणं फार गरजेचं होतं आणि ती घेतलीं गेलेलीं नाही. मा. महापौर साहेब, निश्चितपणे आपण सत्तेत आलोतर आपल्या कडून लोकांनी अपेक्षा ही करायलाच पाहिजे यामध्ये दुमत असण्याचं काही कारण नाही. परंतु तूप खाल्या खाल्या रूप येत नाही हे सुद्धा तितकेच सत्य आहे. स्वच्छतेच्या कामांमध्ये आपण ज्या काही टिका सहन करतो. तर आयुक्त साहेब असं कुठेही झालेले नाही की सगळीकडचे कर्मचारी एकाच भागत नेले. चार प्रभाग मिळून एक प्रभाग झालेला आहे. चार प्रभागातले जे कुठे कर्मचारी त्या त्या प्रभागामध्ये असतील तेवढेच लोक सकाळच्या तासा-दोन तासांत वापरलेले आहेत. त्यामुळे इतर ठिकाणी कुठे काही झालं असेल असं मला अजिबात वाटत नाही आणि त्याच्याशी मी

सहमत सुध्दा नाही. फोटो काढण्यापुरत जर कोणी म्हणत असेलतर त्या दिवशी मी स्वतः जवळपास सहा किलोमीटरचा रस्ता झाडला ज्या दिवशी सकाळ वर्तमानपत्राने स्वच्छतेची मोहीम त्याठिकाणी चिंचवडला घाटावरती राबवली त्या ठिकाणचे त्यांनी काही व्हिडीओ काढले असतील तर ते सुद्धा संबंधितांनी बघावे. त्यामधे नाटक केलं की काम केलं. त्यामुळे काम करतो ते पोटतिडकीने काम करतो पोटतिडकीने काम करणा-यावरच विश्वास ठेवतो. तुमच्या टीका "सर आखोंपर" तुम्हांला नाव अजीबात ठेवणार नाहीत. तुम्ही ज्या टीका कराल त्यातच आम्ही आमची दुरुस्ती करणार आहोत परंतु ते करत असताना सुध्दा मला आम्हाला अजून काही कालावधी लागणार आहे आणि तो कालावधी निश्चितपणे पुढचा बदल हा तुमच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घालणारा असणार आहे एवढच या ठिकाणी मी सांगते आणि इथेच थांबते, जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर राहुल जाधवच आणि अभिषेकच मी अभिनंदन करतो कारण अभिनंदन एवढ्या साठीच करतो कि दिवाळीच्या शुभेच्छा देत असताना दिवाळीचे फटाके वाजवण्याची संधी आपण काही जणांना दिली. मला माहिती आहे की दिवाळी असली की फटाके तर वाजणारच. याची जाणीव निश्चितच सभागृहाला आहे आपल्यालाही सर्वांना आहे आणि योगेश भाईंनी खूप चांगल सांगितलं की अजितदादांच्या सर्टिफिकेटची गरज नाही. मी आजही म्हणतो की या सभागृहामध्ये काम करण्यासाठी अजितदादांच्या सर्टिफिकेटची खरच गरज नाही. आणि हे खरं आहे आजची या शहरांमधली कच-यांच्या समस्याच्या संदर्भा मधे सत्ताधारी पार्टीचे नगरसेवक असतील किंवा विरोधी पक्षाचे नगरसेवक असतील कच-याची १००% समस्या या शहरांमध्ये आहेच. हाच कचरा काढण्याचे काम आम्ही करतोय हे लक्षात ठेवा. कारण मला माहित आहे चित्र जर बघितलंतर, म्हणजे ताई ज्यावेळेस सांगत होत्या की स्थायी समितीच्या माध्यमातून आम्ही खरे तर कुठल्या ठेकेदाराला कमी जास्त प्रमाणामध्ये सवलत मिळावी म्हणून आम्ही जात नाही कारण ठेकेदार अजूनही आम्हाला माहीत नाहीत. गेल्या पंचवीस तीस वर्षांमध्ये ठेकेदाराची कुंडली ज्यावेळेस तुमच्याकडे आहे मला असं वाटतं की ठेकेदरासाठी भारतीय जनता पार्टी कधीच काम करणार नाही लक्षात ठेवा. आणि आजची जी ही परिस्थिती आहे आज शहरांमध्ये कच-याची समस्या ज्या पद्धतीने निर्माण झाली ही समस्या काही आमच्यामुळे नाही निर्माण झाली. मला माहिती आहे की ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी

आरोग्याच्या संदर्भामध्ये मा. आयुक्त साहेब असतील आम्ही सगळे पदाधिकारी असतील चार चार वेळेला या संदर्भामध्ये बैठका घेतल्या आणि त्यांना सांगितलं की कच-याची समस्या कचरा उचलला गेला पाहिजे, कचरा झाडला गेला पाहिजे. हे आम्हालाही वाटतं ना म्हणजे दिवाळी आली दोन- चार चांगल्या गोष्टी लोकांच्या ऐकायला पाहिजेत. त्या चांगल्या शुभेच्छा आम्हालाही मिळाल्या पाहिजेत असंच वाटतं ना आम्हाला. हे आम्ही काय उघड्या डोळ्याने बघत नाहीत पण वस्तुस्थिती कधीकधी नाकारता येत नाही हे लक्षात ठेवा. म्हणजे ज्या पद्धतीने कच-याच्या झाडण्याच्या संदर्भामध्ये होतं खरतर आशाताई ज्यावेळेस बोलत होत्या ते खरं आहे. गेली दहा वर्षांपूर्वीची परिस्थिती आपण बघितली "एस" नावाच्या आपण ज्या काही कच-याच्या संदर्भामध्ये कचरा उचलण्याच्या गाड्या घेतल्या गेल्या आणि त्याच्या नंतरच्या काळामध्ये एकही टेंडर महापालिकेच्या वतीने गाडयांच्या संदर्भामध्ये काढलं गेलं नाही. का नाही काढलं, आज बघतोय की गाड्या कीती बंद पडतात म्हणजे आपण बघितलं की नेहरुनगरच्या आगारांमध्ये आपण बघितलं अर्ध्या गाड्यांची परिस्थिती बंद पडलेली आहे काही गाड्या पासिंगच्या तिथे आरटीओच्या ऑफिसमध्ये अडकल्या जातात. खरं तर आपल्याला ही शहराची स्वच्छता करत असताना आपण राजकारण करण्याची गरजच नाही. आपण विदाऊट राजकारण करता, खरं तर आरोग्याच्या अधिका-यांचे मी अभिनंदन करेन की त्यांनी त्याही परिस्थितीमध्ये काही ठेकेदार मला माहीत आहेत मागच्या महिन्यापूर्वीची जी परिस्थिती होती अ आणि फ प्रभागातल्या ड्रायव्हर लोकांनी संप केला. मी सात वाजता त्या ठिकाणी होतो त्या ड्राईव्हरची विनंती करत होते की बाबारे तुम्ही संप मिटवा. पगार दिले जात नाहीत त्यांचे, कोणाचे ठेकेदार आहेत. काढा सगळे ६७- ६८ ठेकेदार आहेत, पगार दिला जात नाही अशा पद्धतीची परिस्थिती जर हे ठेकेदार करत असतीलतर मला असं वाटतं की ठेकेदार पोसणा-या नेत्यांनी कृपा करून अशा पद्धतीचे आरोप करू नयेत आणि मी एवढेच सांगेन मा. महापौर तुम्हाला पुढच्या काळामध्ये मा. आयुक्त तुम्हाला ही विनंती करतो या संदर्भामध्ये जी जी कारवाई करायची म्हणजे जे टेंडर्स असतील ते टेंडर लवकरात लवकर आपण करून घेऊन, खरतर मला कधीकधी आश्चर्य एका गोष्टीचं वाटतं की महापालिकेच्या गाड्या आणि ड्रायव्हर दुस-याचे म्हणजे आपली गाडी कोणीही चालवा म्हणजे अशा पद्धतीचा कारभार या अगोदरच्या काळामध्ये झाला आणि त्याला गाडी नाही. म्हणजे ड्रायवर नाही आला की गाडी बंद आणि गाडी बंद तर ड्रायव्हर मोकळा. सगळाच भोंगळ कारभार या महापालिकेचा

खरतर मला या विषयावर बोलायचंही नव्हतं पण विषयाला सुरुवात केली सर्वांनी फटाके वाजवण्याची सुरुवात केली. मला एवढेच सांगायचे मा.कमिशनर साहेब, आपल्यालाही विनंती करायची की या संदर्भामध्ये कचरा उचलण्याच्या संदर्भा मधली टेंडर शेवटच्या माध्यमातून आहेत आणि आपण चांगल्या पद्धतीने करतोय. शहराचे दोन भाग करुन आपण कचरा उचलण्याची देखील प्रक्रिया करतोय आणि कच-याच्या संदर्भामध्ये आपण पुढच्या काळामध्ये हे जे ४०० ड्रायव्हर आहेत, सूर्यवंशी नावाचा ठेकेदार कोण आहे मला माहित नाही म्हणजे तो सूर्यवंशी नावाचा ठेकेदार आहे तो ड्रायव्हर सप्लाय या महापालिकेला करतो कचरा उचलण्यासाठी कोणाचा ठेकेदार आहे. आजही उपोषणाला बसलेत, हिंमत असेल तर कधीकधी एखादी गोष्ट केली तर मनापासून असं सांगितल पाहिजे कि हा ठेकेदार आमच्या जवळचा आहे. दिवाळी आली तर तो उपोषणाला बसतोय. मी सगळ्या नगरसेवकांना विनंती करतो मी आज माझ्या आरोग्य अधिकारीशी बोललो त्यांना सांगितलं ड्रायव्हर मुळे जर काम बंद पडत असेलतर ४०० ड्रायव्हर आपण इमिजिएट देऊ शकतो. अशी काही परिस्थिती नाही लक्षात ठेवा. माझी अशी विनंती आहे कि जे अधिकारी चुकीच्या पद्धतीने काम करतील आणि या शहराचं या सभागृहाच लक्ष दुर्लक्ष आपण दुसरीकडे नेण्याचा जर प्रयत्न करतोय मला असं वाटतं की त्या सभागृहाच दुर्लक्ष आपण चांगल्या पद्धतीने नेण्यासाठी हे शहर स्वच्छ करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कोणाच्या सर्टिफिकेटची आजही गरज नाही मला माहित आहे की हा कचरा गेल्या अनेक वर्षांपासून तुम्ही या शहरांमध्ये साठवलांय. फक्त कचराच नाही लक्षात ठेवा अनेक गोष्टी आहेत शहरामधल्या ते साफ करण्याचे काम पुढच्या काळामध्ये करावच लागेल आणि पारदर्शक कामाला तर आम्ही बांधील आहोत. खरंच नाना धर्माधिकारींच्या संस्थेच मी अभिनंदन एवढयासाठी करतो अनेक संस्था आहेत लक्षात ठेवा त्या स्वतःहून रस्ता साफ करण्यासाठी या शहरातील कचरा साफ करण्यासाठी पुढे येतायेत. मला असं वाटतं की फोटोसाठी आपण हा कच-याचा इश्यूज करू नये. सगळ्यांनी कुठे गेले होते स्वच्छतेच्या दिवशी, आपण जेव्हा स्वच्छतेचे अभियान करत होतो. मला असं वाटतं की शहर स्वच्छतेसाठी माझा प्रभाग, माझ्या घराच्या आसपासचा प्रभाग जर दहा मिनीटे स्वच्छ करण्यासाठी जर मी मैदानात उतरलो असतो तर मी तुमच मनापासून अभिनंदन केलं असतं. मा.पंतप्रधानांनी स्वच्छ भारताच काम दिलं म्हणून भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी स्वच्छतेसाठी काम कराव इतर पक्षांच्या नेत्यानी काम करू

नये असं तर कुठे लिहिलं नव्हतं. मा. महापौरांना विनंती करतो खरतर या संदर्भात आपल्याला अधिक लक्ष देण्याची गरज आहे आणि तुमच्या चुका मुळे आज या महानगरपालिकेला या कच-याच्या समस्येला आपल्याला सामोरं जावं लागलं मला वाटतं की हे दुर्भाग्य आहे. दत्ता काका मी तुम्हाला एवढेच सांगतो तुम्ही कुठल्याही पक्षांमध्ये असलात तर मला वाटतं की तुमच्या पक्षांमध्ये ही तुमची वेळोवेळी अवहेलना आहे आणि मला असं वाटतं की तुम्ही बोलल्याच्या नंतर तुम्ही काहीही करा म्हणजे कच-याची समस्या तर मला माहिती आहे की मागच्या काळामध्ये तर मी या सभागृहामध्ये होतो या ठिकाणी कचरा कोणी आणला आणि सचिन दादा तुझा काही अपमान करण्याची परिस्थिती नव्हती. कारण आंदोलन शहरांमध्ये करणा-या, सगळ्यात जास्त अंदोलनामध्ये गुन्हे असलेला मी कार्यकर्ता आहे. आंदोलन करत असताना कुणाच आंदोलन चिरडावं त्याच्या भावना दुखवाव्यात अशा पद्धतीची आमची कधीच भूमिका नाही हे लक्षात ठेवा. परंतु जे मला असं वाटतंय कि मुंबईची परिस्थिती जर बघितली त्याचाही कुठेतरी विचार कर मित्रा. आरे आपल्या पक्षाचे नगरसेवक पळवून नेत असताना आपली पाठ थोपटली. अभिषेक आणि राहुल दादा मी तुम्हाला एवढेच सांगेन विरोधी पक्षाच्या नेत्यांवर विश्वास ठेवू नका सभागृहांमध्ये तुमचं नाव घेतलं की तुम्ही फार चांगलं बोललं मला असं वाटतं की या टॅक्ट यांच्या आहेत मला असं वाटतं की या निमित्ताने मी एवढेच सांगेन की पुढची जनरल बॉडी आपल्याला या ठिकाणी लगेचच घ्यायची आहे हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.कोमल मेवाणी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८१ विषय क्रमांक – ४

दिनांक – १६.१०.२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.०१/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१६/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.जयश्री गावडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.कोमल मेवाणी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८२ विषय क्रमांक – ५

दिनांक – १६.१०.२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

दि.०८/०८/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.जयश्री गावडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.कोमल मेवाणी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८३ | विषय क्रमांक – ६

दिनांक – १६.१०.२०१७ | विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**अ)** दि.१४/०७/२०१७ व दि.२८/०७/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब) दि. ११/०८/२०१७** चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) **दि.२८/०८/२०१७** चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.जयश्री गावडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ | प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर –**सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

-----

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/९/कावि/४५७/२०१७
दिनांक - २/१२/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.